अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ११ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३४३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## भारत-पाक पावसामुळे उर्वरित सामना आज रंगणार

**सोलापूर :** फलंदाजीसाठी पोषक खेळपट्टीवर बाबर आजमने नाणेफेक जिंकून भारताला आयते कोलीत दिले. रोहित आणि शुबमन या जोडीने चौकार-षटकारांची आतषबाजी करातना पहिल्या विकेटसाठी १२१ धावांची विक्रमी भागीदारी केली. रोहित ५६ धावांवर ( ४९ चेंडू, ६ चौकार व ४ षटकार) झेलबाद झाला, तर शुबमनही ५२ चेंडूत १० चौकारांच्या मदतीने ५८ धावांवर बाद झाला. दोन्ही सेट फलंदाज माघारी परतल्यानंतर भारताचा डाव थोडासा मंदावला. विराट कोहली व लोकेश राहुल यांनी संयमी खेळावर भर दिला. २४.१ षटकानंतर पावसाला सुरुवात झाली आणि मैदानावर कव्हर्स टाकण्यात आले.

साडेपाच वाजता पाऊस थांबल्याने ५.५७ ला कव्हर्स काढण्याचं काम सुरू झालं, परंतु ६.०२ वाजता पुन्हा पाऊस सुरू झाला. ८ मिनिटांनी तो थांबला. ६.२२ वाजल्यानंतर षटकं कमी होत गेली. ७.३० वाजता मैदानाची पाहणी केली गेली आणि अम्पायर्सनी बराच वेळ घेतला. ९ वाजता पुन्हा मॅच सुरू होईल. पण, त्यापूर्वीच पुन्हा मुसधार पावसाची सुरूवात झाली आहे आणि आता मॅच होण्याची शक्यता मावळत चालली होती आणि तेच झाले. राखीव दिवशी उर्वरित मॅच होणार आहे.

# बंद लिफाफ्यातून वाजली 'धोक्याची घंटा'

# ७ खासदार, ३० आमदार 'व्हेंटिलेटर'वर

## अनेक प्रश्नांच्या चिंतेने भाजप खंगत चाललाय...

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणजे भाजप...भाजप म्हणजे नरेंद्र मोदी असे या देशाचे समीकरण झाले आहे. देशात मोदींविषयी आजही क्रेझ असली तरी महाराष्ट्रातील भाजप मात्र, चिंतेने ग्रासला आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका कशा जिंकायच्या? मतदारांना काय म्हणून तोंड दाखवायचे? निष्क्रिय खासदार, आमदारांचे काय करायचे? महायुतीमूधन रणनीती कशी ठरवायची? हे सारे प्रश्न भाजपला आतून पोखरून काढत आहेत.चिंता-काळजी मनात फार दिवस साठवता येत नाही. त्यासाठी वेळीच त्या बाहेर काढल्या हव्यात. भाजपने वेळीच ती दक्षता घेतली आणि गेल्या काही महिन्यांपासून लागून राहिलेले टेन्शन अखेर बाहेर काढले. नुकत्याच झालेल्या एका बैठकीत बंद लिफाफ्यातून धोक्याची घंटा वाजवली गेली. राज्यातील भाजपचे ७ खासदार आणि ३० आमदार व्हेंटिलेटरवर असल्याचे स्पष्ट होताच भाजप नेत्यांचे डोळे गरगरले. पक्षातली ही बाब उघड करण्याची हिम्मत पक्षाचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवून दिली.**

उद्धव ठाकरे यांची शिवसेना फोडून फडणवीस यांनी राज्याची सत्ता महाविकास आघाडीकडून हिसकावून घेतली. ५० आमदार फोडणे हा काही जोक नव्हताच. फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ते करून दाखवले. उद्धव सोडून गेले तरी एकनाथ शिंदे हे सोबतीला आल्यानंतर भाजप नेत्यांमध्ये एक मोठा आत्मविश्वास आला होता मात्र पुढे पुलाखालून बरेच पाणी वाहिले.फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसही फोडली. अजितदादा यांना सत्तेचा आश्रय दिला.आता महायुतीचेही सरकार तीन पायांचे झाले आहे.

महायुतीच कायम राहिली तर आगामी निवडणुका कशा लढवायच्या? जागांचे वाटप कसे करायचे? समजा सत्ता आली तर पदांची वाटणी कशी करायची? १६ आमदार अपात्र ठरले तर शिंदे गटाचे काय करायचे? अजितदादांवर किती म्हणून लक्ष ठेवायचे? राज्यातले अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.तेव्हा जनतेला काय उत्तर द्यायचे? हे यक्षप्रश्न भाजपपुढे आहेत. लोकसभा निवडणुकीला अवघे काही महिने राहिले असताना भाजपने खासदारांच्या,आमदारांच्या कामाचे आणि लोकप्रियतेचे सर्वेक्षण केले आहे. त्यात भाजपच्या एकूण ७ खासदारांची,३० कामगिरी खराब आढळून आली.त्यामुळे भाजपच्या अनेक खासदार आणि आमदारांची चिंता वाढली आहे.



येत्या लोकसभा निवडणुकीआधी भाजप असे दोन-तीन सर्व्हे करणार आहे. खराब कामगिरी करणाऱ्या आमदार-खासदारांनी सुधारणा न केल्यास त्यांचे तिकिट कापले जाण्याची दाट शक्यता आहे.

### बैठकीत काय घडले?

शुक्रवारी गरवारे क्लबमध्ये भाजप विधानसभेचे आमदार, विधानपरिषदेचे खासदार, लोकसभेचे खासदार, राज्यसभेचे खासदार यांची विभागवार बैठक झाली. सकाळी सुरू झालेले बैठकांचे सत्र रात्री उशिरापर्यंत सुरू होते. बैठकीला राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. यावेळी सर्व आमदार, खासदारांना एक बंद लिफाफा देण्यात आला. तो सर्वांना उघडण्यास सांगण्यात आला. या लिफाफ्यात खासदार, आमदारांची त्यांच्या मतदारसंघातील लोकप्रियता, सोशल मीडियावरील त्यांची सक्रियता, त्यांनी केलेली विकासकामे, प्रचार यासारख्या मुद्यांची माहिती होती.

### सोमय्यांना संधी, कोटक यांना धोका?

मातोश्रीच्या नाराजीमुळे गेल्या निवडणुकीत भाजप नेतृत्त्वाने किरीट सोमय्यांचे तिकीट कापले. त्यामुळे सोमय्या माजी खासदार झाले. पण त्यानंतरही ते पक्षासाठी तितकेच सक्रिय राहिले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर भाजप-सेनेची युती तुटली. कोटक यांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह असताना सोमय्या सक्रिय आहेत. त्यामुळे ईशान्य मुंबई मतदारसंघातून सोमय्यांना संधी दिली जाऊ शकते.उत्तर मुंबईचे खासदार असलेल्या गोपाळ शेट्टींच्या कामगिरीवर पक्ष समाधानी आहे.

### चांगलीच कानउघाडणी...

५० पेक्षा अधिक गुण असलेल्या लोकप्रतिनिधींना अधिक सक्रिय होण्यास सांगण्यात आले. तर ६० हून अधिक गुण मिळवणाऱ्या खासदार, आमदारांना त्यांची कामगिरी आहे तशीच कायम राखण्याचा सल्ला देण्यात आला. काही आमदार, खासदारांची शिवप्रकाश आणि फडणवीसांना चांगलीच कानउघाडणी केल्याचे समजते. राज्यात भाजपचे एकूण २३ लोकसभा खासदार आहेत. त्यातील ५ ते ७ खासदारांची कामगिरी वाईट आहे. मतदार आणि स्थानिक पदाधिकारी खासदारांच्या कामगिरीवर तर विधानसभेच्या १०५ आमदारांपैकी २५ ते ३० जणांच्या कामगिरीवर मतदार नाराज आहेत. त्यांना अधिक सक्रिय होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### भाकरी फिरवणार....

मुंबईतील खासदार पूनम महाजन, मनोज कोटक यांच्या नावांचा समावेश आहे. मुंबईत लोकसभेच्या सहा जागा आहेत. पैकी तीन जागा भाजपकडे आहेत. यातील दोन जागांवर भाजप भाकरी फिरवू शकतो. महाजन उत्तर मध्य मतदारसंघाचं प्रतिनिधीत्व करतात. २०१४ पासून त्या खासदार आहेत. त्यांच्या मतदारसंघात आशिष शेलार आणि विनोद तावडे तगडे उमेदवार ठरू शकतात, असे भाजपचे सर्वेक्षण सांगते.

## तुळशी येथे भामट्याची 'चांदी'

### ॲसिडने दागिने धुतले; ७ महिलांच्या चांदीचे दागिने वजनात झाले कमी

**सोलापूर :** चांदीचे दागिने आणि पितळाच्या मूर्ती पॉलिश करून देतो अशी थाप मारून दुचाकी वरून आलेल्या एका भामट्याने ७ महिलांच्या चांदीचे दागिने ॲसिडमध्ये धुवून १९ हजारांची चांदी घेऊन पसार झाला. ही फसवणुकीची घटना तुळशी (ता.माढा ) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. यासंदर्भात नितीन नामदेव गेंड(रा.तुळशी) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी एमएच ४१-एव्ही-८६८४ या दुचाकी वरून आलेल्या भामट्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. नितीन गेंड यांची पत्नी आणि भावजयसह रतन दगडे, सुरेखा दगडे, छाया दगडे, रूपाली दगडे, सविता निंबाळकर आदींच्या धुवून दिलेले चांदीचे दागिने देखील वजनात कमी दिसून आले. भामट्याने एकूण १८ हजार ९०० रुपयाची चांदी वितळवून घेऊन पसार झाला.



सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात श्रावण रविवारनिमित्त दर्शनासाठी भाविकांचा उत्साह दिसून आला.

## वडील रागावल्याच्या कारणावरून तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** अभियांत्रिकी झालेल्या एका २४ वर्षीय तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना विजापूर नाका झोपडपट्टी नंबर २ येथे घडली . दीप्ती पप्पू टोणपे (वय २४ रा.वि.नाका झोपडपट्टी नं.२) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे.

वडील रागावल्याच्या कारणावरून तिने शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास राहत्या घरात छताच्या हुकाला दोरीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर शनिवारी सायंकाळी शासकीय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ती पहाटे मयत झाली.

मयत दीप्ती टोणपे हिच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली. सहाय्यक फौजदार शेख पुढील तपास करीत आहेत.

## ४० मजली इमारतीवरून लिफ्ट कोसळली, ६ कामगारांचा मृत्यू

सुराज्य/ठाणे

बाळकुम परिसरात असलेल्या रुणवाल आयरीन या ४० मजली इमारतीवरून लिफ्ट कोसळून पाच कामगारांचा जागीच मृत्यू झाला. तर या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दोन कामगारांना रुग्णालयात दाखल केले जात असताना वाटेत एका कामगाराचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले असून पोलीस याप्रकरणी अधिक चौकशी करत आहेत.

बाळकुम येथील नारायणी शाळेच्या बाजूला रुणवाल आयरीन या नुकतेच बांधकाम पूर्ण झालेल्या ४० मजली इमारतीच्या छतावर वॉटरप्रूफिंगचे काम सुरू होते.

हे काम संपवून कामगार खाली येत असताना लिफ्टचा दोर तुटल्याने हा अपघात घडला.

घटनेची माहिती प्रत्यक्षदर्शींनी बाळकुम अग्निशमन दलाला कळवली. तातडीने बाळकुम अग्निशमन दलाचे स्टेशन अधिकारी ओमकार वैती घटनास्थळी टीमसह पोहोचले. तसेच या घटनेची माहिती मिळताच स्थानिक माजी नगरसेवक संजय भोईर यांनी दुर्घटनास्थळी धाव घेत बचाव कार्यात मदत केली.



उजनी टक्केवारी +२०.२५
दौंड विसर्ग १२,२२० क्युसेक

## शिक्षण विभागातील लिपिकाची होणार चौकशी

सुराज्य/सोलापूर

जि. प. माध्यमिक शिक्षण विभागात प्रतिनियुक्तीवर असलेले लिपिक संजय बाणूर यांची चौकशी करणार असल्याची माहिती अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी दिली.

शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे, यांच्यासह अनेक शिक्षकांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे या संदर्भात लेखी तक्रार केली होती . १७ मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषद प्रशासनाकडे देण्यात आले होते. त्यावर प्रशासनाने काहीच कारवाई केली नसल्याने कार्याध्यक्ष शशिकांत पाटील, करमाळा तालुकाध्यक्ष विजयकुमार गुंड तर शिक्षक मायप्पा हाके, यास्मीन अन्सारी, शरद पवार, नौशाद सय्यद यांच्यासह अन्य शिक्षक शिक्षक दिनापासून जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारावर उपोषणाला बसले होते. प्रशासनाला माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागातील अडचणीबाबत १७ मागण्यांचे निवेदन प्रशासनाला दिले होते.

## पोलखोल करण्याची धमकी देऊन खंडणी घेतली; बार्शीत दोघांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

तू मंत्र्याचा पीए आहे असे म्हणून लोकांची फसवणूक करतो. त्याबद्दल लाईव्ह पत्रकार परिषद घेऊन तुझी बदनामी करतो अशी धमकी देऊन १० हजार रुपयाची खंडणी घेतल्याची घटना बार्शी येथे नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात बार्शी शहरच्या पोलिसांनी दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

राजेंद्र भगवान गायकवाड (रा.वाणीप्लॉट बार्शी) आणि






योगेश वसंत लोखंडे (रा. सुभाष नगर बार्शी) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. या संदर्भात आनंद नागनाथ यादव (वय ३१ रा.शिवाजीनगर, पाटील प्लॉट बार्शी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

गायकवाड आणि लोखंडे या दोघांनी मिळून त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला. आणि तू मंत्र्याच्या पीए आहे असे म्हणून लोकांची फसवणूक करीत आहे. त्याची आम्ही लाईव्ह पत्रकार परिषद घेऊन पोलखोल करणार आहे, असे म्हणत यादव यांच्या फेसबुकवर बदनामीकारक मजकूर टाकला. त्यानंतर बदनामी थांबवायची असेल तर १० हजार रुपये दे असे सांगितले. आणि गायकवाड याने पैसे घेतले. हा प्रकार २३ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या दरम्यान घडला. असे यादव यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक उदार करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुम्हाला नकोय, तिकडे पाहिजे आहे, पाऊस!

## जिल्ह्यात पावसासाठी मुस्लिम बांधवांकडून नमाज पठण

सुराज्य/सोलापूर

**पावसाची कृपा व्हावी म्हणून हिंदू संस्कृतीत अनेक प्रकारच्या प्रार्थना आढळतात. त्यानुसार आजही विविध धार्मिक विधी करून वरूणराजाला आळवणी केली जाते. ही आस्था केवळ हिंदू संस्कृतीतच नाही तर अन्य धर्मामध्येही पहायला मिळते. त्याची प्रचिती रविवारी खुद्द सोलापुरात आली.**

राज्यातील अनेक भागात पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे राज्यातील काही भागात सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सोलापुरात देखील सध्या दुष्काळसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पावसासाठी रविवारी मुस्लिम बांधवातर्फे विशेष नमाज पठण करण्यात आले अहले हदिस संघटनेतर्फे रंगभवन ईदगाह येथे पावसासाठी या विशेष नमाजचे



आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शेकडो मुस्लिम बांधवानी उपस्थित राहून पावसासाठी प्रार्थना केली.

जेव्हा दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते, तेव्हा असा एकत्रित नमाज अदा केला जातो. मुस्लिम बांधवांच्या या नमाजला 'नमाजे इस्तेस्का' असे म्हटले जाते. जेव्हा दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते. त्यावेळी खुल्या मैदानात एकत्रित येऊन ही नमाज अदा केली जाते. तसेच क्षमायाचना करत अल्लाहकडे पावसासाठी दुआ केली जाते. सोलापूर जिल्ह्यात पावसाने चांगलीच ओढ दिली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. कारण खरीपाची उभी पिके वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. बहुतेक शेतकऱ्यांची पिकं करपू लागली आहेत. मंगळवेढा, सांगोला, बार्शी, अक्कलकोट, दक्षिण आणि उत्तर सोलापूर, मोहोळ या तालुक्यांतील पिकांना पावसाअभावी सर्वाधिक फटका बसला आहे. यंदा जिल्ह्याचे गळीतधान्य, अन्नधान्य आणि कडधान्यांचे उत्पादन घटणार आहे. आता पिकांना वाचवण्यासाठी शेतकऱ्यांचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. पाऊस नाही, उजनीतून पाणी सोडले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसमोरील अडचणींचा डोंगर वाढला आहे.

# राजनैतिक यश...

नवी दिल्लीमध्ये सुरू असलेल्या जी-२० शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली जाहीरनामा सर्वानुमते स्वीकारण्यात आल्याची महत्त्वाची घोषणा केली. गेल्या काही दिवसांपासून या जाहीरनाम्याच्या मसुद्यावर सहमती होत नव्हती. मात्र, भारताच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनी अखेरपर्यंत केलेल्या प्रयत्नांना यश आले. या जाहीरनाम्यात कोणते महत्त्वाचे मुद्दे आहेत आणि त्यावर सहमती होण्यात कोणत्या अडचणी होत्या, ही सहमती झालीच नसती तर काय झाले असते हे भारतीयांना कळायला हवे. 'एक देश, एक कुटुंब आणि एक भविष्य' या घोषणेने या जाहीरनाम्याची सुरुवात करण्यात आली आहे. युक्रेन युद्ध, कूटचलन, जागतिक वित्तीय संस्थांमध्ये सुधारणा, हवामान बदल, मजबूत, टिकाऊ, संतुलित व सर्वसमावेशक वाढ, नियमावर आधारित, भेदभावरहित, न्याय्य आणि पारदर्शक जागतिक व्यापार, टिकाऊ विकास ध्येय, टिकाऊ भविष्यासाठी प्रदूषणमुक्त विकास करार, जगातील भूक व कुपोषणाचे निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, महासागरांचा पर्यावरणस्नेही वापर व संवर्धन या मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. जाहीरनाम्याचा मसुदा तयार करण्यासाठी हरियाणाच्या नूह येथे ६ ते ९ सप्टेंबरदरम्यान जी-२०च्या सदस्य देशांच्या शेर्पांची (वाटाघाटी करणारे) बैठक झाली. त्यामध्ये इतर सर्व मुद्द्यांवर मतैक्य झाले होते. मात्र, युक्रेनचा उल्लेख करताना कोणत्या शब्दप्रयोगांचा वापर करावा, यावर सहमती होण्यास वेळ लागला. सुरुवातीला सदस्य देशांमध्ये प्रसृत करण्यात आलेल्या ३८ पानांच्या मसुद्यातील 'भौगोलिक परिस्थिती' हा परिच्छेद रिक्त ठेवण्यात आला. हवामान बदल, कूटचलन आणि जागतिक वित्तीय संस्थांमध्ये सुधारणांचा प्रस्ताव यांचा समावेश असलेल्या इतर ७५ परिच्छेदांवर सदस्य देशांच्या शेर्पांची सहमती होण्यास वेळ लागला नाही. जाहीरनाम्याच्या मसुद्यात चार वेळा युक्रेनचा उल्लेख आला आहे. बाली परिषदेतील चर्चेचे स्मरण करून, युक्रेनमध्ये सर्वसमावेशक, न्याय्य आणि टिकाऊ शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन करण्यात आले. युक्रेनच्या मुद्द्यावर संयुक्त राष्ट्रांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावाचे पालन करावे, असे दिल्ली जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले आहे. युक्रेन युद्धाचा जागतिक अन्न व इंधन सुरक्षितता, पुरवठा साखळी, स्थूल-वित्तीय स्थैर्य, चलनवाढ यावर परिणाम झाला आहे. जग कोरोनाच्या संकटातून सावरत असतानाच या युद्धामुळे विशेषतः विकसनशील व अविकसित देशांच्या आर्थिक धोरणांवर विपरीत परिणाम झाला आहे, याकडे या जाहीरनाम्यात लक्ष वेधण्यात आले आहे तसेच रशिया-युक्रेन काळा समुद्र धान्य करार पुन्हा केला जावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही शिखर परिषदेच्या अखेरीस संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध केला जातो. त्यामध्ये परिषदेत चर्चा झालेल्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश असतो. दिल्ली जी-२० शिखर परिषदेला चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे दोघेही अनुपस्थित होते. त्यामुळे आधीच या परिषदेचे महत्त्व कमी झाले आहे का, अशी चर्चा केली गेली. गेल्या वर्षीच्या बाली जाहीरनाम्यामध्ये युक्रेनसंबंधी दोन परिच्छेदांचा समावेश होता. सुरुवातीला रशिया आणि चीनने त्याला सहमती दर्शवली होती, पण नंतर घूमजाव केला होता. या अस्थिरतेमुळे युक्रेन युद्धाच्या मुद्द्यावर रशियाची सहमती कशी मिळवायची, हे मोठे आव्हान शेर्पांसमोर होते. गेले वर्षभर भारतात ठिकठिकाणी सुरू असलेल्या जी-२० चर्चा, संमेलने आणि परिसंवादांमध्ये असा कोणताही लक्षणीय जाहीरनामा किंवा ठराव प्रसिद्ध झालेला नाही. त्यामुळे सहमती न मिळाल्यामुळे संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध झालाच नसता तर दिल्ली परिषदेच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असते. संयुक्त जाहीरनाम्यात युक्रेन युद्धासह सर्व मुद्द्यांवर सहमती झाली नसती तर वेगवेगळ्या देशांची मते सांगणाऱ्या वेगवेगळ्या परिच्छेदांचा समावेश केला गेला असता. जी-२० शिखर परिषदेचा जाहीरनामा प्रसिद्ध न होण्याची गेल्या २० वर्षांत पहिल्यांदाच नामुष्की ओढवली असती. जी-२० समूहाच्या सर्व सदस्य देशांनी जाहीरनाम्याचा स्वीकार करणे हे भारताचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे यश मानले जाते. भारताचे शेर्पा अमिताभ कांत यांनी अखेरपर्यंत प्रयत्न सोडले नाहीत आणि अखेर रशियासह सर्व देशांची सहमती घडवून आणली. त्यामुळे भारतीय अधिकारी आणि पंतप्रधान मोदी यांच्यासाठी हे मोठे यश मानले जात आहे.



## आध्यात्मिक

# श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव

**नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेना महाराज यांची ६५३वी पुण्यतिथी उत्सव श्रावण वद्य द्वादशी सोमवार दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता मातोश्री सिद्धव्वाबाई हत्तुरे सांस्कृतिक भवन (विमानतळासमोर) हत्तुरेवस्ती येथे व श्री संत रामलू कोंडूर यांच्या मार्गदर्शनाखाली व सिलीसिद्ध राऊत यांच्या अध्यक्षतेखाली व अनेक कार्यकर्त्यांचे सेवेतून कार्यक्रम होणार आहे. त्यानिमित्त...**

आपण कोणत्या जातीत जन्माला यावे, हे आपल्या हातात नाही, परंतु ज्या जातीत जन्माला आलो, त्या जातीची प्रतिष्ठा वाढविणे हे आपल्या हातात आहे. श्री संत ज्ञानदेव, श्री संत नामदेव यांच्या संत मंडळीतील श्री संत सेना न्हावी हे एक असे संत आहेत की, ------------ व्यवसायालाच त्यांनी परमार्थाचे रुप देऊन समाज मनाला विवेक दर्पण दाखवून उपदेश केला आहे.

श्री संत सेना महाराज यांचा जन्म मध्यप्रदेशातील बांधवगड येथे इ. स. १३०१ मध्ये नाभिक समाजात झाला. संत सेनाजींच्या जन्माने नाभिक समाजाला वेगळा मानसन्मान मिळाला आहे. श्री संत नगाजी महाराज, सद्‌गुरु योगीराज, श्री शंकर महाराज, श्री सद्‌गुरु हभप दादामहाराज सातारकर, सद्‌गुरु बाबा महाराज सातारकर हे नाभिक समाजात जन्माला आले. बाबा महाराज म्हणतात, 'संतांना जात नसते, परंत आम्हाला अभिमानाने सांगावेसे वाटते की, या संतांमुळे आमच्या नाभिक समाजाची उंची व प्रतिष्ठा वाढली आहे. नाभिक समाज हा बारा बलूतेदारांपैकी एक आहे. इतर मागासवर्गीयांमध्ये अनेक संतांनी जन्म घेऊन ओबीसींना मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली आहे.'



श्री संत सेनाजी बांधवगड येथे राजा वीरसिंह यांची सेवा करत असताना एके दिवशी राजाची सेवा करण्यास उशीर झाल्याने राजाने त्यांना अटक करण्याचा आदेश देताच प्रत्यक्ष परमेश्वर पांडुरंग सेनाजींचे रुप घेऊन राजाची सेवा केली आणि सेनाजींचे प्राण वाचवले. राजाला जेव्हा समजले की सेवा करणारा सेना न्हावी नसून प्रत्यक्ष पांडुरंग होते. राजावीरसिंहाने सेनाजींची पाद्यपूजा केली आणि शिष्यत्व स्विकारले, असे एकमेव उदाहरण आहे. परमेश्वराची सेवा सेनाजींनी केली परंतु परमेश्वराचे दर्शन राजाला झाले. परमेश्वर भक्ताच्या संकटाला धावून आले व सेनाजींचे प्राण वाचले, हे अनन्य साधारण उदाहरण आहे.

श्री संत सेनाजींच्या सुस्वभावाप्रमाणे नाभिक समाज हा पापभिरु, विनयशील, नम्र समाज आहे. त्यागी, स्वामीनिष्ठ व विश्वासू आहे. नाव्ह्याने दाढी करताना गिऱ्हाईकांचा वस्तऱ्याने गळा कापला आहे, असे जगात एकही उदाहरण उद्याप घडले नाही. सोलापुरात लहान-मोठे, साधे-एअरकंडीशन्ड सुमारे एक हजार सलून शॉप आहेत. एवढे सलून कामगार नम्रपणे दहा लाख नागरिकांची सेवा करुन दहा लाख नागरिकांच्या केसाची आकर्षक रचना करुन तयांचे सौंदर्य वाढवतात. त्यामुळे त्यांना त्यांचे कार्यात यश प्राप्त होते. एवढे श्रेय नाव्ह्यांना द्यावे, ही नाभिकांनी केलेली फार मोठी सेवा आहे. कोरोना काळात खूप उपासमार झाली.

सलून कामगारांना सध्या चांगले दिवस आले आहेत. यापेक्षा आणखीन शासकीय सवलती मिळवण्याचा प्रयत्न चालू आहे. नाभिक समाजातील बऱ्याच व्यक्ती वेगवेगळ्या क्षेत्रांत मोठमोठ्या पदावर काम करतात, उच्च विद्याविभूषित आहेत. पदाधिकारी, अधिकारी, कलावंत व उद्योगपती आहेत. याचा आम्हा सर्व समाजबांधवांना रास्त अभिमान आहे. या सर्वांनी अल्प आर्थिक उत्पन्न गटांना मदत करावी. या समाजबांधवांनी संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव समारंभास उपस्थित राहून एकमेकांचा परिचय व्हावा, समाजाची उंची व प्रतिष्ठा वाढवावी. समाजात अद्याप जे अशिक्षित किंवा अल्प शिक्षित आहेत, त्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी. शिक्षण हे व्यक्तीच्या व समाजाच्या पर्यायाने देशाच्या सर्वांगिण विकासाची गुरुकिल्ली आहे. समाजाचा आर्थिक विकास व्हावा, समाज बांधवांमध्ये जिव्हाळ्याचे, स्नेहाचे संबंध प्रस्थापित व्हावेत, गैरसमज दूर व्हावेत, कालबाह्य रुढी, परंपरा व अंधश्रद्धा याला तिलांजली देऊन वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा, सर्व समाज निर्व्यसनी व्हावा, गरीबी व दारिद्र्य दूर करण्यासाठी व्यवसनात खर्च होणाऱ्या पैशातून कुटुंबाचा घरखर्च सहज भागवता येते, अशी जाणीव निर्माण व्हावी.


आज सलून व्यवसायिकांची मुले, मुली डॉक्टर, इंजिनिअर झाले असून बरेच मुली, मुले उच्च शिक्षण घेत आहेत. काही विद्यार्थी या परदेशात शिक्षण घेत आहेत. यांचा आदर्श इतरांनी घ्यावा व ही समाजिक प्रगती ग्रामीण भागापर्यंत पोहोचावी, अशी अपेक्षा संत सेनाजींच्या चरणी करतो.

**- पांडुरंग चौधरी, सोलापूर.**

## टुडेज् ब्लॉग

# विवेकानंदांचे अजरामर भाषण

**स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो येथील १८९३ ला झालेल्या सर्वधर्मपरिषदेतील व्याख्यानास (आज) ११ सप्टेंबर रोजी १३० वर्षे पूर्ण होत आहेत. स्वामी विवेकानंदांचे नाव घेतले की डोळ्यासमोर येते ते त्यांचे जागतिक सर्वधर्म परिषदेतील भाषण. या भाषणाने विवेकानंदांबरोबरच भारतालाही जगात एक वेगळी ओळख मिळवून दिली होती.**




विवेकानंदांनी आपल्या भाषणाची सुरुवात माझ्या बंधू आणि भगिनींनो अशी करताच उपस्थितांनी काही मिनिटे टाळ्यांचा कडकडाट केला. ज्यांनी संपूर्ण जगाला स्त्री आणि पुरुष या दोन वर्गात विभागले होते, त्यांच्यासाठी स्वामीजींचे हे संबोधन आश्चर्यकारक होते. स्वामी विवेकानंदांनी प्रत्येक स्त्री आणि पुरूषांमध्ये भाऊ आणि बहिणीचे नाते दाखवून दिले होते. जगामध्ये कोणतेही असे भाषण नसेल, ज्याचा संबोधन दिवस वाढदिवसासारखा साजरा केला जात असेल. शिकागोमधील विवेकानंदांच्या या भाषणाने संपूर्ण जगामध्ये खळबळ उडवून दिली होती. यावरूनच या संस्मरणीय भाषणाचे ऐतिहासिक महत्व सिद्ध होते. संपूर्ण जगाला धर्माचा मार्ग दाखविणाऱ्या, साधू-संतांची प्राचीन परंपरा असलेल्या देवभूमी भारताचे आपण प्रतिनिधित्व करत असल्याचे सांगून विवेकानंदांनी परिषदेत उपस्थित जगातील तमाम विद्वांनांसमोर संस्कृतमधील श्लोकांचा दाखला देऊन त्यांचे अर्थ सांगत 'ज्याप्रमाणे वेगवेगळ्या नद्या वेगवेगळ्या ठिकाणी उगम पावून अखेरीस समुद्राला जाऊन मिळतात, त्याचप्रमाणे माणूस आपल्या इच्छेनुसार वेगवेगळे मार्ग निवडतो. हे मार्ग सरळ असो की वाकडे-तिकडे, ते शेवटी भगवंतापर्यंतच जातात. हे स्पष्ट करून 'जो माझ्यापर्यंत येतो, तो कसाही असो, मी त्याचा स्वीकार करतो. कुणी कुठलाही मार्ग निवडो, अखेरीस माझ्यापर्यंतच येतो' असे गीतेतील श्लोकांच्या आधारे समजावले. प्राचीन परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या योगी स्वामी विवेकानंदांनी जगामध्ये शांती आणि विश्वबंधुत्व यांचा प्रसार केला. दया, परोपकार, करुणा, सद्भावना, बंधुत्व आदी सदाचारांना जीवनात उतरविले. त्यांनी कट्टरता, धर्मांधता, जातीवाद, अस्पृश्यता, अनिष्ट चालीरिती, गुलामगिरीचा नेहमी विरोध केला. त्यांनी देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्याचे स्वप्न पहिले. हे सर्व त्यांनी त्यावेळी केले, ज्यावेळी एक धर्म दुसऱ्या धर्माला शत्रू समजत असे, एक देश दुसऱ्या देशाकडे संशयाने पाहत असे आणि साम्राज्यवादाचे राजकारण चालत असे.

आज स्वामीजींच्या शिकागो येथील भाषणाच्या १३० व्या वर्षानिमित्त जगाला पुन्हा एकदा शांततेची, बंधुत्वाची गरज निर्माण झाली असून त्याचबरोबर कट्टरतावाद संपविण्याची ही निकड भासू लागली आहे. कमीतकमी शब्दांत भारतीय संस्कृती, भारत भूमी, परंपरा, संस्कृति आणि धर्म या गोष्टींचा जगाला परिचय करून देऊन स्वामीजींनी फक्त औषधच सांगितले नाही, तर आजारच न होण्याची उपाययोजनाही सांगितली. त्यांनी शिकागोमध्ये स्पष्ट केले की, 'जगात धर्माच्या नावाखालीच जास्त रक्त सांडले असून कट्टरता आणि सांप्रदायिकतेमुळेच जास्त रक्तपात झाले आहेत. इतरांचा धर्म नष्ट करून आपल्या धर्माचा प्रचार होऊ शकत नाही. त्यांनी धर्मांधतेला विरोध करण्याचे आणि मानवतेला प्रतिष्ठा देण्याचे आवाहन संपूर्ण जगातील धर्मबांधवांना केले होते. म्हणूनच स्वामीजींच्या या भाषणाला पुन्हा एकदा पूर्ण ताकदीने जगासमोर ठेवण्याची आवश्यकता असून आज सुद्धा संपूर्ण जगाने स्वामीजींची शिकवण अवलंबीली पाहिजे, असे वाटते. जरी आज स्वामीजींच्या भाषणाला १३० वर्षे लोटली असली तरी, आजही ते तितकेच मार्गदर्शक असून ते आजच्या परिस्थितीसाठीच तयार केले असावे असे वाटते. ही प्रासंगिकताच या भाषणाचे महत्व अधोरेखित करते, त्याला अजरामर करते.

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

# भूदान चळवळीचे प्रवर्तक

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १२८ वि जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला.




१९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरुवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली, तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातून मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

## जन्म हा अखेरचा

# शुश्रूषुस्थल - १



आमच्यासमोर तुमच्या रुपाने अनेक मूर्ती बसलेल्या आहेत. आपली किंमत किती आहे - एक रुपया, शंभर रुपये, एक लाख रुपये. हे घरी जाऊन तुम्हीच ठरवा. काही जण इथे प्रवचन ऐकून इथेच सोडून देतात. काही जण इथे ऐकून घरी गेल्यावर प्रवचनात काय काय सांगितले हे आठवणींने सांगतात आणि नंतर विसरतात तर काही जण प्रवचनात जे ऐकतात ते आपल्या मनात ठेवून त्याचे मनन करतात.

श्रवणानंतर मनन केले पाहिजे. जे ऐकले त्यावर वारंवार विचार करणे याला मनन म्हणतात. मननामुळे ज्ञान दृढ होते. ऐकल्यावर मनन करतो तो खरा श्रोता. वडिलांनी मुलाला 'जा दुकानातून साखर आण' असे सांगितले आणि त्यानंतर मुलगा तिथेच बसून राहिला तर त्याचा ऐकण्याचा काय फायदा? तो फक्त ऐकतो, कृती मात्र करीत नाही. आपलेही श्रवण असे असेल तर काय कामाचे? गीतेचा उपदेश केल्यावर देखील अर्जुन स्वस्थ बसलेला पाहून श्रीकृष्णाला विचारावे लागले, 'मी जे सांगितले ते तू नीट ऐकले आहेस ना?' तुझ्या ठिकाणी असलेली क्षात्रवृत्ती जागी व्हावी. तू हाती शस्त्र घेऊन युद्ध करावे यासाठीच तर मी गीता सांगितली आहे.'' हे ऐकल्यावर अर्जुन उठून म्हणाला, ' हो, तुझे बोलणे मी लक्षपूर्वक ऐकले आहे. तुझ्या सांगण्याप्रमाणे मी वागणार आहे.

**करिष्ये वचनं तव ।**' याप्रमाणे आपण लक्षपूर्वक गुरुपदेश ऐकला पाहिजे. त्याचे मनन केले पाहिजे आणि नंतर आचरण केले पाहिजे. चोरी करु नये. असत्य बोलू नये असा उपदेश ऐकून देखील माणसावर काही परिणाम होत नाही, ते याच जन्मात नव्हे तर गेल्या अनेक जन्मात हेच ऐकत आलेले असतात. परंतु त्यांच्यावर त्याचा काहीही परिणाम झालेला नसतो. जो उत्तम शिष्य असतो तो लक्षपूर्वक गुरुपदेश श्रवण करतो. त्याचे मनन करतो आणि त्यानुसार आचरण करतो. गुरुजवळ गेल्यावर काय विचारावे, कसा प्रश्न करावा, हे पुढील श्लोकात सांगतात.

**(क्रमश:) - काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# गणेशमूर्ती एव्हढ्या महाग का?



गेल्या वर्षी राज्य सरकारने पुढील वर्षीपासून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्यांवर बंदी आणणार असल्याचे जाहीर केले होते; मात्र गेल्याच मासात यावर युटर्न घेऊन सरकारने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्यांना अनुमती दिली आहे. पर्यावरणप्रेमी तसेच सामाजिक संघटनांच्या प्रबोधनामुळे गेल्या काही वर्षांत गणेशचतुर्थीच्या निमित्ताने शाडू मातीची मूर्ती घरी आणणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. यावर्षी समस्त गणेशमूर्ती विक्री केंद्रांत प्लास्टर ऑफ परिससोबत मातीच्या मूर्तीही विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. गणेशचतुर्थीच्या काळात पुजली जाणारी गणेशमूर्ती ही मृत्तिकेपासून म्हणजेच मातीपासून बनवली जावी असा शास्त्रसंकेत आहे. त्यामुळे ग्रामीण भागांत पिढ्यान्‌पिढ्या घरी मातीच्याच मूर्त्या आणल्या जातात. कोकणासारख्या ठिकाणी जिथे घरोघरी गणपती आणला जातो तिथे प्रत्येक गावात मातीच्या गणेशमूर्ती बनवणारी पिढीजात घराणी आहेत, शहरामध्ये मातीच्या मूर्त्या घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले असले, तरी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या तुलनेत मातीची मूर्ती कमालीची महाग असते, हेही तितकेच सत्य आहे.

शहरात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्या ज्या दरांत मिळतात, त्याच्यापेक्षा कितीतरी स्वस्त ग्रामीण भागांत तेव्हढ्याच आकाराच्या मातीच्या मूर्ती मिळतात मग शहरांत मातीच्या मूर्त्या एव्हढ्या महाग का विकल्या जातात, याकडेही सरकारने लक्ष द्यायला हवे. वाढत्या महागाईचा फटका यंदा गणेशमूर्त्यांनाही बसला असून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्या तर महाग झाल्याच आहेत सोबत मातीच्या मूर्त्यांचे दरही गगनाला भिडले आहेत. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्यांवर बंदी घालताना सरकारने मातीच्या मूर्ती शहरी भागांत माफक दरात मिळण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न करावेत !

**- जगन घाणेकर, मुंबई.**

# मुलांना विचार देणे गरजेचे

आधुनिक काळात आईपण निभावणे वाटते तितके सोपे नाही. मोबाईल, टीव्ही, इंटरनेटच्या युगात लहान वयातच मुलांना अनेक गोष्टी पाहण्यास मिळत आहेत. मुलांवर संस्कार करून त्यांना जबाबदार व्यक्ती म्हणून घडवणे ही आईची जबाबदारी मानली जाते.

काही अप्रिय घडल्यास आईने संस्कार केले नाहीत अशी टिप्पणी केली जाते. तेव्हा कालसुसंगत व आधुनिक काळाचा विचार करून घरातील मुलांना विचार देणे गरजेचे असते.

**- अर्चना काळे, नाशिक.**



# - संतविचार -

**डॉ. देविदास गुरव, सोलापूर**

**पैल तो गे काऊ कोकताहे ।**
**शकुन गे माये सांगताहे ।।१।।**
**उड उड रे काऊ ।**
**तुझे सोन्याने मढीन पाऊ**
**पाहुणे पंढरीराऊ घरा कै येती ।। २।।**
**दहिभाताची उंडी ।**
**लावीन तुझ्या तोंडी**
**जीवा पढिये त्याची ।**
**गोडी सांग वेगी ।।३।।**
**दुधे भरून वाटी लावीन तुझे वोठी**
**सत्य सांगे गोठी ।**
**विठो येईल कायी ।।४।।**
**आंबया डाहाळी फळे चुंबी रसाळी**
**आजचि रे काळी शकून सांगे ।।५।।**
**ज्ञानदेव म्हणे जाणिजे खुणे**
**भेटती पंढरीराणे शकुन सांगे ।।६।।**

विठ्ठलाच्या दर्शनासाठी अत्यंत व्याकूळ झालेल्या विरहिणीची (ज्ञानदेवांची) मन:स्थिती अतिशय उत्कटपणे चित्रित झालेली आढळून येते. कावळ्याची कावकाव म्हणजे शुभशकुन असतो. माऊलीने या लोकसमजूतीचा अचूक व मोठ्या कौशल्याने उपयोजन केले आहे.

भगवंताचे जीवनातील शुभ आगमन व कावळ्याला प्रलोभन दाखवणारी मराठमोळी स्त्री यांचा उत्तम समन्वय साधला आहे.

विठोबाशी तादात्म्य साधण्यासाठी माऊली इतकी उत्सुक आहे की, त्यामुळे कावळ्यासारख्या अतिसामान्य जीवाला सुद्धा अत्यंत सन्मानाने संबोधले आहे. अत्यंत प्रेमाने 'काऊ' असे संबोधून त्याला मनाचे स्थान दिले आहे. ती विरहिणी म्हणते, सखे पहा ना! पलीकडाचा कावळा कधीपासून कावकाव करत आहे. जणू माझ्या घरी कुणी पाहुणा येणार आहे असे शुभ सूचना सांगत आहे. अरे! काऊ तो पंढरीचा राणा पाहुणा म्हणून कधी येणार आहे

# 'पैल तो गे काऊ कोकताहे'

ते सांग ना! हे बघ! तुझे पाय मी सोन्याने मढवीन. तोंडी दहीभाताची उंडी (घास) देईन, पण माझा प्रिय पंढरीनाथ घरी कधी येईल हा सांगावा लवकर सांग. दुधाने भरलेली वाटी तुझ्या ओठाला लावीन परंतु खरंच तो विठ्ठल माझ्या घरी येईल का? अरे काऊ वाटलं तर तू अंगणातील आंब्याच्या झाडाला लगडलेली रसाळ फळे तूच चाख, मात्र आजच मला तू शुभशकुन सांग, माझ्या बोलण्यातल्या खाणाखुणा ओळखून शुभ वार्ता त्वरित ऐकव.

माऊलीच्या रचनेतील विरहिणी अहोरात्र पंढरीरायाची वाट पाहात आहे. त्याचाच ध्यास तिच्या मनाला लागला आहे. त्याच्या दर्शनाकरिता ती कमालीची उतावीळ झाली आहे. मन अधिकाधिक अधीर होत आहे. सावळ्या पांडुरंगाने जणू तिला वेड लावले आहे. तेवढ्यात पलीकडे काऊ कोकताना आढळून येतो. जणू तो शुभवार्ता घेऊन येणारा दूतच वाटला. याची कावकाव निरर्थक नाही हे तिच्या लक्षात आले आणि ती कावळ्याशी हितगुज साधते. त्याला विविध प्रलोभने दाखवते.



आपल्या मनातील भगवंत भेटीची ओढ नि उत्कटता ती व्यक्त करते.

माऊलीने अतिशय संवेदनशीलपणे अंत:करणातील मधुराभक्तीला अस्सल मराठमोळे रूप दिले आहे. एकप्रकारे मऱ्हाटमय विराणीतून नादमय व भक्तीच्या 'नादाविष्कार' प्रत्यक्ष अनुभवता येतो.

संतांच्या प्रतिभेचे असे कितीतरी पैलू त्यांच्या वाणीतून अनुभवयास येतो. फक्त समरस होऊन त्यांच्या 'अंतरीचे गुज' ऐकण्याची क्षमता आली पाहिजे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# क्रीडा संकुलाच्या माध्यमातून जिल्ह्यात आंतराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत : बनसोडे

✔ सुराज्य/पंढरपूर

जिल्ह्यातील तरुणांना विविध खेळात नैपुण्य प्राप्त करण्याच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध व्हाव्यात, क्रीडा क्षेत्रात आपले नावलौकिक प्राप्त करता यावे, यासाठी सर्व सोयी सुविधायुक्त क्रीडासंकुलाची निर्मिती करण्यात येत असून, जिल्ह्याचा गौरव वाढविण्यासाठी क्रीडा संकुलाच्या माध्यमातून आंतराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.



शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे जिल्हा क्रीडा विभागाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, मोहोळचे प्रांताधिकारी अजिंक्य घोडके, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, अपर तहसिलदार तुषार शिंदे, तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, क्रीडा अधिकारी सुनिल धारुरकर, राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, जयराज मुंढे उपस्थित होते.

यावेळी क्रीडामंत्री श्री बनसोडे म्हणाले, राज्यात चांगले खेळाडू तयार व्हावेत यासाठी शासनाने क्रीडा क्षेत्राला प्राधान्य दिले असून,खेळाडूंना केंद्रस्थानी मानून क्रीडा विभागाचे निर्णय घेण्यात येत आहेत. सर्वसामान्य होतकरु आणि गरीब कुटुंबातील खेळाडूना शासकीय योजनांचा लाभ मिळवा यासाठी सराव आणि स्पर्धेसाठी आवश्यक ती मदत करुन सोयी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. जिल्ह्यात ज्या तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुलसाठी जागा उपलब्ध नाही तसेच अपुऱ्या जागा आहेत अशा ठिकाणी कार्यवाही करुन तात्काळ प्रस्ताव सादर करावे. जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यासाठी एक कोटी निधीची उपलब्धता असून ज्या संकुलाची कामे चालु आहेत ती कामे दर्जेदार करुन घेण्यासाठी संबधित अधिकाऱ्यांनी दक्ष राहून नियोजित वेळेत पुर्ण करावीत. जिल्ह्यातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंची यादी तयार करावी जेणे करुन त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देता येईल अशा सूचनांही क्रीडामंत्री बनसोडे यांनी यावेळी दिल्या.

राज्य शासन सर्व खेळाडूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून राज्यात उत्कृष्ट खेळाडू निर्माण व्हावेत यासाठी प्रत्यक्षात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ सुरू करण्यात आले आहे. ऑलिम्पिक दर्जाचे खेळ, त्यासंबंधीचे प्रशिक्षण खेळाडूंना दिले गेले पाहिजे. यापूर्वी गुजरात, हरियाणा, पंजाब अशा प्रांतातील खेळाडूंसाठी असे भवन उभारून त्यांना अधिक उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्रातल्या खेळाडूंसाठी ही सोय व्हावी यासाठी आपण राज्यात ऑलिम्पिक भवन उभे करणार आहोत. आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे खेळाडू प्रत्येक खेळात चमकले पाहिजेत. त्या दृष्टीने या खेळाडूंना सरकारची सर्व प्रकारची मदत दिली जाईल. बारा मुद्दे लक्षवेधी आहेत त्याआधारे खेळाडू निवडून त्यांना प्रशिक्षण दिले जाईल. ऑलिम्पिक डोळ्यासमोर ठेवून त्या दृष्टीने खेळाडू तयार होण्याचे नियोजन केले जाणार असल्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी जिल्ह्याच्या ठिकाणी विविध खेळाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य शासनाकडून व केंद्र शासनाकडून प्राप्त निधीच्या माध्यमातून जिल्ह्यातील खेळांडूसाठी खेळाचे मैदान , योगा हॉल, क्रीडा साहित्य, जलतरण तलाव ,वसतीगृह, आदी सोयी-सुविधांची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी दिली.



## कृषीदूतांनी सांगितले रोग व्यवस्थापनाचे महत्व

✔ **सोलापूर** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित वडाळा येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत एकात्मिक रोग व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये भंडारकवठे गावातील शेतकऱ्यांना पिकांवरील रोग व त्यावरील एकात्मिक व्यवस्थापनाची माहिती दिली. निसर्गाला समजून घेऊन वेळोवेळी शेत निरीक्षण करीत राहणे व त्यानुसार रोग नियंत्रणाचे विविध उपाय योजले तर अनावश्यक फवारण्या व त्यावरील खर्चात बचत होते. रोगांची संख्या ठराविक मर्यादित असतानाच बुरशीनाशकाचा वापर झाल्यास फवारण्यांची संख्या कमी करता येते. त्यांचे अंश कमी होतात. पर्यावरणीय हानी कमी होते. कमीत कमी खर्चात परिणामकारक रोग व्यवस्थापन , रासायनिक बुरशीनाशकांचा कमी वापर, उन्हाळ्यातील खोल नांगरट, रोगप्रतिकारक वाणाची निवड, आलटून-पालटून पीक घेणे, जैविक पद्धतीने रोग नियंत्रण या संदर्भात माहिती देण्यात आली. या चर्चासत्राचे आयोजन प्राचार्य डॉ. सचिन फुगे, प्रा. आकाश अवघडे सर, प्राध्यापिका ज्योती जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदूत महेश आढेगावकर, पंकज आयरे, संदीप चव्हाण, रोहित गडगे, रोहन कौरती, प्रथमेश कुदळे यांनी केले.

## लोणारी संघशाखेचे मंगळवेढ्यात आज उद्घाटन

✔ **मंगळवेढा** : सोमवार दि.११ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता शहर व ग्रामीण लोणारी समाज मंगळवेढा यांची अखिल लोणारी समाज सेवा संघ शाखा मंगळवेढा या नावाने शाखा उदघाटन समारंभ स्थळ- महिला उद्योग प्रशिक्षण केंद्र, इंग्लिश स्कुलचे २ नंबर गेट शेजारी होत आहे.

यावेळी अखिल लोणारी समाज सेवा संघ पुणे, कसबा मतदारसंघ, आमदार रविंद्रभाऊ धंगेकर, मराठी हिंदी चित्रपट सृष्टी अभिनेत्री तेजस्विनी लोणारी, उद्योजक गुरूकुल विद्यापीठ राजूरी ता.सांगोलाचे महादेव बाड, दादरे चरित्र लेखक प्रा.चंद्रकांत गिते (सातारा), दादरे यांचे सहकारी प्रा.महादेव बाड, उपआयुक्त परिवहन विभाग पुणे श्रीमंत आकळे, सचिव अखिल लोणारी समाज सेवा संघ पुणे अविनाश करचे, शैक्षणिक व सामाजिक ट्रस्ट सचिव बाळासाहेब करचे, अखिल लोणारी समाज सेवा संघ पुणे कार्याध्यक्ष तुकाराम बजबळकर, उपाध्यक्ष अखिल लोणारी समाज सेवा संघ पुणे बाळासाहेब आटपाडकर, सोलापूर सामाजिक कार्यकर्ते बिज्जू प्रधाने, पंढरपूर सामाजिक कार्यकर्ते नगरसेवक नवनाथ रानगट, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय लोणारी व सामाजिक कार्यकते पिनू काळेल उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन मंगळवेढा शहर व ग्रामीण लोणारी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.



## विजय बिज्रगी यांना शिक्षकरत्न पुरस्कार

✔ **सोलापूर** : सोलापूर जिल्हा समाज सेवा मंडळ संचलित, जीवन विकास प्रशाला, भंडारकवठे येथे कला शिक्षक म्हणून कार्यरत असलेले कै.दि.शि.कमळे गुरुजींच्या प्रेरणेने गेळी अनेक वर्षे एक समाज शिक्षक म्हणून सींना-भीमा खोऱ्यामध्ये साधना-कुटी सत्संग मंडळाची स्थापना करुन समाजप्रबोधनाच्या माध्यमातून अध्यात्म साधनेचे कार्य करणारे श्री विजय बिजरगी यांना मनोरमा परिवाअंतर्गत कार्यरत असलेली शोभाश्री मल्टि डेव्हप को.ऑ.क्रेडिट सोसायटी लि.सोलापूर यांच्या वतीने शिक्षक दिनाच्या औचित्याने मा.श्री.बाळासाहेब शेळके यांच्या अध्यक्षतेखाली मा.श्री.महेश भंडारी, शिवानंद उन्नद, अशोक भांजे, विश्वनाथ आपणे, उद्योजक मा.श्री. निंगराज विंचुरे, चेअरमन श्री धर्मराज बळळारी, संस्थेचे संस्थापक मा.श्री.किरण पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि. २३ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता प्राथमिक शिक्षक सोसायटी सोलापूर येथे शोभाश्री शिक्षकरत्न पुरस्कार २०२३ देऊन सन्मानीत करण्यात आले.

विजय बिजरगी हे गेली अनेक वर्षे साने गुरुजी कथामालेच्या माध्यमातुन कथा क्रांतिकारकांच्या या उपक्रमांतर्गत संस्कार ब देशभक्ती ही मूल्ये रुजविण्याचे कार्य निरंतरपणे करीत असून कर्मवीर बालक, 'बैलगाडी ओढणारा राजा', 'स्मरणचित्रे', 'मूर्ती घडविताना', 'प्रभाते मनी', 'हे विठ्ठला सावळ्या', 'ज्ञानसूर्य' इ. अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.



## पोळ्याच्या खरेदीसाठी मोहोळच्या बाजारात गर्दी

✔ सुराज्य/सोलापूर

शेतकऱ्यांच्या पोळा सणावर अत्यल्प पावसाचे संकट ओढविलेले आहे. यातच महागाईने डोके वर काढलेले असतानाही त्याची पर्वा न करता पोळ्याचा शेवटचा बाजार असल्यामुळे परिसरातील शेतक-यांनी मोहोळ येथील रविवारच्या आठवडी बाजारात बैलांचे साज व साहित्य खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

शेतक-यांच्या शेतात वर्षभर राबणा-या बैलांचा महत्त्वाचा सण पोळा असतो. हा सण चार दिवसांवर येऊन ठेपलेला असल्यामुळे शेतकरी पोळ्याच्या तयारीला लागलेला आहे. पोळ्याच्या दिवशी आपला बैल सर्वात चांगला दिसावा यासाठी शेतकरी बैलांची चांगली व्यवस्था ठेवीत आहे.

गतवर्षीपेक्षा यावर्षी अत्यल्प पाऊस असल्यामुळे शेतक-यांकडे पैशांची चणचण आहे, अशातच पोळ्याच्या तोंडावर सर्वच साहित्यांची भाववाढ झालेली आहे. पोळ्याच्या दिवशी घरात मातीच्या बैलांची पूजा केली जाते. गतवर्षी या बैलांच्या जोडीत सुध्दा दुप्पट वाढ झाली आहे. विशेष म्हणजे पोळ्याच्या दिवशी नारळाला सर्वाधिक महत्त्व असते. गावागावात असणा-या प्रत्येक देवांच्या मंदिरात बैल पकडणा-या सोबत असलेल्या सहकारी शेतक-यास नारळ फोडावे लागते.त्यामुळे बारा तेरा रुपयांना मिळणा-या नारळाची किंमत सुध्दा आज पंधरा वीस रुपये झाली आहे.

पोळ्याच्या सणाला लागणा-या सर्वच साहित्यांच्या किमती गगनाला भिडलेल्या असतानाही शेतकरी राजा महागाईची पर्वा न करता पोळा सण साजरा करण्यासाठी मोहोळ शहरासह खेड्यापाड्यातील शेतक-यांनी रविवार दि. १० रोजीच्या येथील आठवडी बाजारात साहित्य खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी केल्याचे चित्र दिसून आले आहे

## महिलांसाठी 'सेल्फी विथ ट्री' वृक्षारोपण स्पर्धेचे आयोजन

### पद्मशाली सखी संघम आणि महापालिका पत्रकार संघाचा संयुक्त उपक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

येथील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित पद्मशाली सखी संघम आणि महापालिका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील महिलां व मुलींसाठी वृक्षारोपण करताना 'सेल्फी विथ ट्री' ही अभिनव स्पर्धा गणेशोत्सवानिमित्त आयोजित केल्याची माहिती अध्यक्षा ममता मुदगुंडी आणि सोलापूर महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांनी दिली.

सोलापूर शहरात दिवसेंदिवस उष्णता वाढत आहे. शहरात झाडांची कमतरता असल्याने उन्हाचा त्रास प्रत्येकालाच सोसावा लागतो. तेव्हा वृक्षारोपण आवश्यक आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रोपांना वाढ होण्यासाठी अनुकूल, पोषक वातावरण आहे. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने रोपांची लागवड करुन जतन करणे महत्वाचे आहे. त्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे. कमीत कमी एक - दीड फुटांचे रोपांची लागवड करतानाचे सेल्फी फोटो काढून ९१%५९८८९४० या व्हॉटस्प क्रमांकावर दि. १५ ते दि. २७ सप्टेंबर रात्री पर्यंत पाठवून द्यावेत. रोपांची लागवड करताना पुन्हा काढण्याची गरज भासू नये याची काळजी घ्यावी. ही स्पर्धा 'फक्त सोलापूर शहरातील' समस्त महिला वर्गासाठी आहे. आलेल्या फोटो मधून 'लकी ड्रॉ' पध्दतीने निकाल जाहीर करण्यात येतील.

असे आहे बक्षीसाचे स्वरुप :

प्रथम क्रमांक - 'ट्रव्हल बॅग' (मनोज यलगुलवार यांच्यातर्फे), द्वितीय क्रमांक - सँडविच टोस्टर' (नरेंद्र धारा यांच्यातर्फे), तृतीय क्रमांक - 'टोस्टर' (तुषार जक्का यांच्या तर्फे) तर, उत्तेजनार्थ - 'लेडीज छत्री' (नागेशकुमार गंजी (युनिक टॉऊनतर्फे). तसेच प्रत्येक स्पर्धकाला सहभाग 'प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे.

या अनोख्या स्पर्धेत जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे तसेच अधिक माहितीसाठी ९१%५९८८९४० या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावे, असे आवाहन महापालिका पत्रकार संघाच्या सरचिटणीस प्रमिला चोरगी , सखी संघमच्या उपाध्यक्षा जमुना इंदापूरे, सचिवा ड. रेखा गोटीपामूल, सहसचिवा ममता तलकोकूल, खजिनदार दर्शना सोमा, सहखजिनदार लक्ष्मी कोडम, समन्वयिका अरिता इप्पलपल्ली, अंबुबाई पोतू, कला चन्नापट्टण यांनी केले आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सदस्या रजनी दुस्सा, भाग्यश्री पुंजाल, सुरेखा गोली, लता मुदगुंडी, आरती बंडी, सारिका वंगा, दिव्या रच्चा, पल्लवी संगा, प्रिती बंडी, जयंती बंडी, सुरेखा भिमनपल्ली, स्वरुपा बंडी, स्वाती इंदापूरे, लता बंडी, विजया बत्तुल, विशाखा सरगम, पद्मा उपलंची, प्रभावती दोरनाल, वंदना बंदगी, दुर्गा रेस, नर्मदा रेस, मुक्ता बल्ला, उमा शंकूर, कलावती येलदी, संगीता म्याकम, प्रतिभा दासरी, ममता बोलाबत्तीन, वज्रेश्वरी गाजूल, साधना बेत, प्रमिला चन्नापट्टण आदी प्रयत्नशील आहेत.

## महापालिकेतील मानधन, कंत्राटी कर्मचाऱ्यांची कायम सरळ सेवेत प्राधान्याने नियुक्ती करावी

### धर्मवीर शहर व हद्दवाढ कर्मचारी संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेतील मानधन, कंत्राटी संगणक चालक, यांत्रिकी अवेक्षक, फिल्टर इन्स्पेक्टर, केमिस्ट, स्थापत्य अवेक्षक, पंप ऑपरेटर, वेल्डर, पाणी तपासणी तज्ञ, कनिष्ठ अभियंता विद्युत यांची महापालिकेच्या आकृतीबंध नुसार तसेच सेवा प्रवेश नियमातील अट शिथील करून कायम सरळ सेवेत भरावयाच्या पदाकरीता प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी धर्मवीर शहर व हद्दवाढ कर्मचारी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

धर्मवीर शहर व हद्दवाढ कर्मचारी संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांच्यासह शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले. निवेदनात पुढे म्हटले आहे की, सोलापूर महानगरपालिकेत विविध खात्यामध्ये विविध पदावर मानधन कंत्राटी कर्मचारी मागील १० ते १५ वर्षापासुन सेवा बजावत आहेत.मानधन, कंत्राटी संगणक चालक यांचा सोलापूर महानगरपालिकेकडील विविध विभागात वरिष्ठांन आदेशीत केलेले सर्व कामकाज ईमाने ईतबारे नियमित पार पाडत आहेत. तसेच कोविड- १९ सारख्या संसर्गजन्य महामारीच्या काळात प्रत्यक्ष कोविड प्रतिबंधात्मक क्षेत्रात जीव धोक्यात यालून सलग दोन वर्षे एकही दिवस सुट्टी व गैरहजर न राहता अहोरात्र शासकिय सेवा दिलेली आहे.

या कार्यरत मानधन / कंत्राटी सेवकांना यांना बाह्य यंत्रणेव्दारे मिळणारे मानधन हे तुटपंजे व अल्प असून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह त्यांच्यावरती अवलंबून आहे. शासकिय नोकरीमध्ये वयाची अट असल्याने यापैकी काही सेवकांची वयोमर्यादा ओलांडून गेलेली आहे. रिक्त पदी अथवा समकक्षपदी सेवकांच्या कामाचा अनुभव व त्या पदाची शैक्षणिक अर्हता पाहता त्यांना महापालिकेच्या आकृतीबंध नुसार तसेच सेवा प्रवेश नियमातील अट शिथील करून सरळ सेवेत थेट प्राधान्याने विचार करावा यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी आदेश द्यावेत , असे निवेदनात म्हटले आहे.

वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट शासन प्रायोजित

स्पेशल हॅन्डलुम एक्स्पो सोलापूर २०२३

हातमाग कापड प्रदर्शन व विक्री

प्रत्यक्ष उत्पादकांकडून वाजवी दरात खरेदी करण्याची संधी एकाच ठिकाणी...



कोसा, टसर सिल्क प्रिंटेड साड्या, ड्रेस मटेरियल व शर्ट, ६ व ९ वार कॉटन साड्या, सतरंजी, पंचे, बेडशिटस, चादरी, पिलो कव्हर्स, टॉवेल, नॅपकीन, वॉल हँगिंग बांबु बनाना ब्लेंडेड फॅब्रिक्स व इतरही...

सहभागी संस्थांकडुन 20% विशेष सुट

दिनांक : २ ते १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत

वेळ - स.११ ते रा. ९ पर्यंत

स्थळ - ड्रिम पॅलेस, बॅन्क्वेट हॉल, पोलिस कल्याण केंद्र, सरस्वती चौक, मुरारजी पेठ, सोलापूर.

सामलेटी : ९३७०४९९५३७

- प्रायोजक - महाराष्ट्र शासन वस्त्रोद्योग विभाग

आयोजक - maha handloom Maharashtra State Handlooms Corporation Ltd.

हातमागाचा प्रचार, भारतीय संस्कृतीचा प्रसार

For online purchase, please visti : www.mahahandloom.com



## सिंहगड अभियांत्रिकीमध्ये 'यु.जी.रिसर्च स्कॉलर' स्कीमला प्रारंभ

✔ सुराज्य/सोलापूर

केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात सेंटर फॉर रिसर्च अँड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट च्या वतीने अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी यु. जी. रिसर्च स्कॉलर स्किम ची सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती या सेंटर चे डायरेक्टर ज्येष्ठ वैज्ञानिक तथा माजी कुलगुरू डॉ. एस. एच. पवार यांनी दिली.

अभियांत्रिकी शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना संशोधनाची गोडी लागावी, संशोधनपूरक वातावरण वाढीस लागावे, संशोधन हे देखील एक करिअर पर्याय व्हावा हा हेतू समोर ठेवून ही अनोखी यु. जी. रिसर्च स्कॉलर योजना सुरू करण्यात आली आहे.या उपक्रमात विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी 'ओपन क्वेशचन ओपन बुक' एक्झाम घेण्यात आली. त्यानंतर मुलाखतीतून ५ विभागातून सुमारे ६० विद्यार्थी निवडण्यात आले.

या स्कीमअंतर्गत विविध आंतरशाखीय प्रकल्प विद्यार्थी तयार करतील. असेही डॉ. पवार यांनी सांगितले. या नावीन्यपूर्ण योजनेचे उद्घाटन, पु. अ. हो. सोलापुर विद्यापीठाचे पदार्थ विज्ञान विभागप्रमुख प्रा. विकास पाटिल यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रा. पाटिल यांनी 'नॅनोटेक्नॉलॉजी फायदे व संधी' या विषयावर व्याख्यान सादर केले. या उपक्रमासाठी संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर श्री. संजय नवले यांचे मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**

**ई-निविदा सुचना क्रमांक २६ सन २०२३-२४ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत असलेल्या कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर,४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. ११/०९/२०२३ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २५/०९/२०२३ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | निविदा पूर्व बैठक १८/०९/२०२३ मा. अधिक्षक अभियंता,, सार्वजनिक बांधकाम मंडळ,सोलापूर यांचे कार्यालयात १२.०० वा.,सदर निविदा पूर्व बैठक ( online via link generated). |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | :- | दि. २५ /०९/२०२३ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा बयाणा रक्कम, पॉवर ऑफ अॅटर्नी व इतर मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर "हार्ड कॉपी" १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १.मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | :- | दि. २७/०९/२०२३ मा. अधीक्षक अभियंता,, सार्वजनिक बांधकाम मंडळ,सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३)कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

(द.म.गावडे)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर

DGIPR/2023-24/5/C3400



# राष्ट्रीय लोकअदालतीत २३० प्रकरणे निकाली

## ७ कोटी २१ लाख रुपयांची वसुली

सुराज्य/पंढरपूर

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार तालुका विधी सेवा समितीच्यावतीने राष्ट्रीय लोकअदालतीचे पंढरपूर येथे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये २३० प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये, एकूण ७ कोटी २१ लाख ३० हजार ८१८ रुपयांची तडजोड झाली असल्याची माहिती जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे प्रभारी अध्यक्ष श्री. बी. बी. तोष्णीवाल यांनी दिली.

जिल्हा न्यायालय पंढरपूर येथे दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी या लोकअदालतीमध्ये प्रलंबीत १८ हजार ४१९ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी १९९ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यामध्ये ६ कोटी २८ लाखांची वसुली झाली. तसेच २ हजार ७५० दाखल पुर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यामध्ये ९३ लाख रुपयांची वसुली करण्यात आली. अशी एकूण २३० प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली आहेत. या लोकअदालतीसाठी एकूण ४ पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. या पॅनलमध्ये तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. बी. तोष्णीवाल, न्यायाधीश ए. ए. खंडाळे, न्यायाधीश ए. एस. सोनवलकर, न्यायाधीश एम.आर. कामत, यांनी काम पाहिले

या अदालतीमध्ये दिवाणी, फौजदारी व मोटार अपघात, कौटुंबीक वादाची न्यायप्रविष्ट प्रकरणे तसेच बँका, महावितरण यांची दाखल पुर्व प्रकरणे, वित्तीय संस्था आदी प्रकरणे ठेवण्यात आली होती.

सदरची लोकअदालत प्रथमच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आझमी, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी वेळोवेळी बैठका घेवुन, पाठपुरावा करुन संपन्न केली.

सदर लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. अर्जुन पाटील यांनी प्रस्तावना, व सूत्रसंचालन विधी स्वयंसेवक सुनिल यारगट्टीकर यांनी केले.

# साठ वर्षांपासून नागरीक मतदानापासून वंचित

## सिन्नूर ग्रामपंचायत हद्दीतील वस्त्यांचा प्रश्न

सुराज्य/अक्कलकोट

**सिन्नूर ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजीनगर तांडा, गांधीनगर तांडा, म्हेत्रेनगर तांडा,तांडा दोन आणि भीमनगर अशा वाड्यावस्त्या असून येथील लोकांची सिन्नुर ग्रामपंचायत येथे फक्त कागदोपत्री नोंद असून,ग्रामपंचायत मतदान करण्याचा अधिकार नाही,व मतदार यादी मध्ये नावे सामाविष्ट नाहीत. गेल्या साठ वर्षापासून येथील नागरिक मतदानापासून वंचित आहेत. सिन्नुर ग्रामपंचायत मतदार यादीत नावे नसल्यामुळे या भागातील नागरिकांना साठ वर्षांपासून मतदान करता न आल्याने मतदानापासून वंचित राहावे लागत आहे.**




या भागातील लोकसंख्या अंदाजे दोन ते तीन हजार च्या आसपास आहे.सिन्नुर ग्रामीण भागात सिन्नुर ग्रामपंचायत १९५६ साली स्थापन झालेली आहे.येथे गेल्या ६० वर्षापासून सदर भागात वास्तव्यास आहेत.गांधीनगर तांडा येथे १९६० साली कन्नड मुला-मुलींची जि.प. शाळा चालू करण्यात आली.शिकलेल्या लोकांनी पाल्यांना ६० वर्षांचा पुरावा म्हणून जातीचा दाखला काढण्यासाठी जोडत आहेत. सिन्नर ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासून ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची सिन्नुर ग्रामपंचायत मतदार यादीत नावेसुद्धा अद्याप नाही. सिन्नुर ग्रामपंचायतीकडून ग्रामीण भागात

राहणाऱ्यांकडून घरपट्टी, पाणीपट्टी अशा विविध कर वसुली केली जाते. साठ वर्षापासून राहणाऱ्या लोकांना स्वतंत्र स्मशानभूमी देखील नाही. शासनाने

याची दखल घेऊन ग्रामपंचायत मतदार यादीमध्ये नावे समाविष्ट करून मतदान करण्याचा हक्क मिळवून द्यावा. तसेच स्मशान भूमीसाठी ६० गुंटे जागा गट नं २७८ / १ मध्ये नोंद असून ती जागा बंजारा समाज दहन व दफनभूमीसाठी स्वतंत्र स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी,व मंजुर करण्यात यावे. व ग्रामपंचायात मतदार यादीमध्ये नावे समाविष्ट करून ग्रामपंचायात मतदानाचा अधिकार मिळवून देण्याची मागणी अक्कलकोटचे तहसिलदार बाळासाहेब सिरसट यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी निवृत भुगर्भ शास्त्रज्ञ नरसिंग राठोड , विश्वनाथ राठोड, लोकेश राठोड, पोमू राठोड ई उपस्थित होते.


> शासनाने त्वरीत लक्ष्य घालून आमचे मतदार यादीत नाव नोंद करून ग्रामपंचायत मतदान करण्याचा अधिकार मिळवून द्यावा व स्वतंत्र स्मशान भूमी मंजुर करून द्यावी – नरसिंग राठोड , निवृत भुगर्भ शास्त्रज्ञ म्हेत्रे तांडा दुधनी.



## परिचारक कुटुंबियांनी आयुष्यभर समाज सेवेचे व्रत अंगीकारले : डॉ. कुलकर्णी

**श्रीपूर** : स्व. सुधाकरपंत परिचारक यांनी अनेक सहकारी संस्था उभा करून त्या नावा रूपाला आणल्या. व त्या माध्यमातून खऱ्या अर्थाने शेतकरी, कामगार व कष्टकरी यांच्या जीवनात चैतन्य निर्माण केले. हे काम करत असतानाच अनेक समाजपयोगी उपक्रम राबवत परिचारक कुटुंबीयांनी आयुष्यभर समाजसेवेचे व्रत अंगीकारले असल्याचे प्रतिपादन कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केले.

ते कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त गोपाळपूर येथील वृध्दाश्रमामध्ये कारखान्याच्या सर्व अधिकाऱ्यांच्या वतीने वृध्दाश्रमामधील वृध्दांना गादी उशी, बेडशीट व अन्नदान यांचे वाटप करण्यात आले यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना कुलकर्णी म्हणाले,वृध्दाश्रमातील सर्व व्यक्तींना ज्या परिस्थितीमध्ये वृध्दाश्रमात राहावे लागते त्याबद्दल खंत वाटते परंतु मातोश्री वृध्दाश्रम हे एखाद्या घरात सारखेच असल्यामुळे व पंढरपूर सारख्या पावन नगरीमध्ये असल्यामुळे नक्कीच सर्व वृध्द मंडळींना पांडुरंगाच्या या पावन नगरीत सुख शांती समाधान लाभेल व जिल्ह्याचे आमदार प्रशांतराव परिचारक मालक यांना आरोग्य संपन्न दीर्घायुष्य प्राप्त होवो अशा शुभचिंतन केले. त्याचबरोबर यावेळी पालवी संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी जेवण व फळांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला प्रोडक्शन मॅनेजर एम.आर. कुलकर्णी, केन मॅनेजर संतोष कुमठेकर, मुख्य लेखापाल रवींद्र काकडे, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, कार्यालयीन अधीक्षक भीमराव बाबर, टाइम किपर सोपान कदम व अधिकारी उपस्थित होते.



## माळीनगरच्या महात्मा फुले पतसंस्थेकडून १५ टक्के लाभांश

**माळीनगर** : महात्मा फुले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था माळीनगर ता. माळशिरस यांनी सन २२ -२३ या अहवाल वर्षातही ऑडिट वर्ग अ कायम राखून सभासदांना १५ टक्के डिव्हिडंड देण्याचे संस्थेचे उपाध्यक्ष व सभेचे अध्यक्ष महादेव एकतपूरे यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर केले. संस्थेच्या वतीने सभासद आणि ठेवीदारांना ट्रॅव्हल बॅग सप्रेम भेट देणार असल्याचे सांगून सभासदांनी संस्थेशी व्यवहार वाढवावेत असे आवाहन एकतपूरे यांनी याप्रसंगी केले.

संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण तालुका करण्यास यावेळी सभासदांनी मंजुरी दिली. संस्थेच्या ३० व्या वार्षिक सभेचा अहवाल व विषय वाचन संस्थेचे सेक्रेटरी योगेश कचरे यांनी करून सभासदांनी संस्थेच्या कामकाजावर विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाची समाधानकारक उत्तरे दिली. सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. अहवाल सालात संस्थेचे भाग भांडवल एक कोटी तीन लाख, ठेवी १५ कोटी २९ लाख, कर्ज वसुली ७८.३५ टक्के असून एनपीए शून्य टक्के आहे. तर संस्थेस तरतूद पूर्व नफा एक कोटी ७१ लाख रुपये होऊन निव्वळ नफा ५८ लाख ७७ हजार इतका झाला आहे. अहवाल सालातील संस्थेच्या व्यवहारावर संस्थेचे सभासद विजय नेवसे, प्रदीप बोरावके, महादेव बंडगर यांनी प्रश्न विचारले. सभेस संस्थेचे संचालक किरण गिरमे, कृष्णा भजनावळे, अंकुश फुले, निळकंठ भोंगळे, चंद्रकांत जगताप, सुरज वाघमोडे उपस्थित होते. स्वागत सुरज वाघमोडे यांनी केले. पतसंस्थेने सोने तारण कर्ज, लाईट बिल भरणा केंद्र, लॉकर , आरटीजीएस, एसएमएस सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

## टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी 'टेल टू हेड' सुरु

सुराज्य/सांगोला

सांगोला तालुक्यामध्ये टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी टेल टू हेड याप्रमाणे देण्यात येत आहे हे पाणी सध्या जवळा भागात चालू असून या कालव्यावरील कोळा जुनोनी जुजारपूर या भागातील शेतकरी पंपादवरे कॅनल मधून पाणी उचलत होते. त्यांच्यावर कारवाई केली जात असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार गायकवाड यांनी दिली .

सांगोला तालुक्यात दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी मागणी असलेल्या सर्व ठिकाणी पोहोचवण्याची यंत्रणा राबवली जात आहे सध्या कॅनलला पाणी चालू असून जवळा भागात बुरंगेवाडी जवळा या भागात पाणी चालू आहे यामुळे हे पाणी पूर्ण क्षमतेने यावे म्हणून या कालव्यावर टाकण्यात आलेल्या मोटारी पंप साईफण पद्धतीने शेतकरी पाणी चोरून घेत होते अशा शेतकऱ्यांचे पाणी बंद केले जात आहे व त्यांचे साहित्यही जप्त केले जात आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जात आहे पुढच्या भागात पाणी जावे यासाठी या कालव्यावर चोरून पाणी घेऊ नये अन्यथा त्यांच्यावर कारवाई केली जाईल अशी माहिती उपविभागीय अधिकारी सुशील कुमार गायकवाड यांनी दिली

> टेंभू उपसा सिंचन योजनेकरीता पाण्याची पुरेशी उपलबधता असून पुरेशे पाणी देण्याकरीता लाभधारकांकडून कालव्याचे गेट ओपन करणे, व्हाल ओपन करणे, मोडतोड करणे या बाबी करण्यात येऊ नये. अन्यथा याची दखल घेऊन संबंधितांवर तातडीने कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
>
> **– रा . य . रेड्डीआर**
>
> कार्यकारी अभियंता टेंभू उपसा सिंचन योजना



## निसर्ग फौडेशनने माणसे जोडली : हिंडोळे

सुराज्य/अक्कलकोट

निसर्ग सेवा, फौडेशनच्या नावातच सेवा असल्यामुळे हे अव्दीतीय कार्य आहे. म्हणून स्वयंस्फूर्तीने सेवाभावाची माणसे जोडली जात असल्याचे गौरव उद्गार नगर सेवक महेश हिंडोळे यांनी काढले.

ते निसर्ग सेवा फौंडेशनच्या वतीने फत्तेसिंह क्रिडांगणाचे स्वच्छता व १८ बाकड्यांचे लोकार्पण सोहळा कार्यक्रम संपन्न झाला प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून नगर सेवक महेश हिंडोळे बोलत होते.

या वेळी प्रसिद्ध विधीज्ञ अँड शरद फुटाणे फांडेशनचे संस्थापक सुनिल बिराजदार प्रसिद्ध उद्योगपती विलास कोरे राजकुमार हिप्परगी, गुरुमामुली मल्लम्मा पसारे वैशाली लोकापूरे सुनिता हडलगी विद्यादर गुरव प्रमोद लोकापूरे सचिन किरनळ्ळी नीलकंठ कापसे आदी उपस्थित होते.

या प्रसंगी फत्तेसिंह क्रिडांगणावरील कडू गवत झाडी झुडपे काढून स्वच्छ केले आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते १८ बाकड्यांचे लोकार्पण करण्यात आला. या बाकड्याचे किडांगणावर फिरायला येणाऱ्या अबाल वृद्ध नागरीक महिलांना बसण्यासाठी सोयीचे होणार आहे. या आधी श्री स्वामी समर्थ' अन्नछत्र मंडळाने ही या ठीकाणी ३० बाकडे बसवले होते, त्यात आणखीन भर म्हणुन निसर्ग सेवा फौंडेशनने १८ बाकडे ठेऊन मोलाचे कामगिरी केलेले आहे .या सामाजीक कार्यात आपले खारीचे वाटा राहावा या हेतूने उद्योगपती विलास कोरे यांनी निसर्ग सेवा फाउंडेशनला ११ हजार रुपये देणगी देऊन सुप्रभात मॉर्निंग गृपच्या वतीने सुनिल बिराजदार यांचे सत्कार करण्यात आले.

यावेळी विश्वनाथ देवरमनी, शंकर आलोणे तात्या समाणे सोमेश्वर पाटील, श्रीकांत आलंदी, आनंद विभुते अनिल बिडवे, सिद्धाराम मोगे, बजे सर सुरेश पाटील सुरेश हिरापूर राजकुमार एकबोटे, प्रफुल्ल ईचगे महेश लंगोटे, रघुनाथ कापसे, शिवाजी चौगुले अंबण्णा पवार, चिदानंद बाबा शिवानंद कार्ले शरणु मुदगोंडा, विशाल पसारे महेश पाटील रेवणप्पा पाटील शिवानंद पत्तरगी रामलिंग शेरीकर श्रवण भास्कर जयसिंग यादव आदी फाउंडेशनचे सदस्य होते .

## अक्कलकोट येथे काठी आणि उसाने मारहाण

**अक्कलकोट** : अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिराजवळ काठी,ऊस आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत आदित्य संजय चव्हाण (वय १७ रा.शिवाजीनगर तांडा,अक्कलकोट) हा तरुण जखमी झाला. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

महेश आणि अन्य तिघांनी मिळून अज्ञात कारणावरून त्याला मारहाण केली अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## मंगळवढ्यातील विभागीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी म्हात्रे

सुराज्य/सोलापूर



महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीने यंदाच्या वर्षी मंगळवेढा येथील महाराष्ट्र साहित्य परिषद दामाजीनगर शाखेच्यावतीने विभागीय साहित्य संमेलन होणार असून संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी अरुण म्हात्रे यांचे सर्वानुमते निवड करण्यात आली असल्याची माहिती विभागीय संमेलनाचे समन्वयक पद्माकर कुलकर्णी आणि मसाप दामाजीनगर शाखेचे अध्यक्ष प्रकाश जडे यांनी दिली आहे.

थमंगळवेढा येथे विभागीय साहित्य संमेलनाच्या संदर्भात स्वागत अध्यक्ष माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांच्या अध्यक्षपदाच्या निवडीचा निर्णय जाहीर करण्यात आला. याप्रसंगी कवी म्हात्रे यांचे मसाप दामाजी नगर शाखेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी २ आणि ३ डिसेंबर २०२३ या तारखा संमेलनासाठी निश्चित करण्यात आल्या असल्याची माहितीही पद्माकर कुलकर्णी आणि प्रकाश जडे यांनी दिली.

थमंगळवेढ्याला संत चोखामेळा, संत दामाजी आणि संत कान्होपात्रा यांची साहित्य परंपरा आहे. मंगळवेढ्याच्या संत दामाजी नगरीत हे विभागीय साहित्य संमेलन होत असल्याने शाखेच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या संमेलन यशस्वी करुन दाखवणार असल्याचे मोठ्या उत्साहाने सांगितले.या वेळी मसाप दामाजी नगरचे कार्याध्यक्ष दिगंबर भगरे, प्रमुख कार्यवाह माजी प्राचार्य डॉ. सुभाष कदम, कार्यवाह संभाजी सलगर व लहु ढगे, डॉ.दत्ता सरगर, सचिन गालफाडे, गोरक्ष जाधव, लक्ष्मण नागणे, रेखा जडे, भारती धनवे, सुवर्णा काशिद, अँड.हसिना सुतार, मसाप सोलापुर शाखेचे कार्यवाह राजेंद्र भोसले उपस्थित होते.

## कृष्णाच्या दहा अवतारातून काटवे यांचे भरतनाट्यम


सुराज्य/सोलापूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या वतीने सुरू असलेल्या रंगवर्धन उपक्रमात श्रीनिअंबा नृत्यालयाच्या वतीने भरतनाट्य विशारद श्रीनिवास काटवे यांनी रंगवर्धन चे ३७ वे पुष्प गुंफले. जन्माष्टमी निमीत्त श्रीकृष्णाय तुभ्यं नमःश्रश्र हा कार्यक्रम सादर झाला. यात श्री जयदेव रचित गीतगोविंद मधिल पहिली अष्टपदी दशावतार कीर्ती धवलम् नृत्यातून सादर करण्यात आली.

या अष्टपदी मध्ये जयदेव म्हणतात की, कृष्णानेच जगाच्या कल्याणासाठी मत्स्य, कुर्म , वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, बलराम, बुध्द व कल्की हे दहा अवतार घेतले आहेत. त्याचे अत्यंत विलोभनीय दर्शन आपल्या नृत्यातून श्रीनिवास काटवे यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.

प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर शेवटी जेष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी आभार मानले.

याप्रसंगीअखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे सहकार्यवाह सुमित फुलमामडी, कार्यकारणी सदस्य व्यंकटेश रंगम, अँड.अरविंदअंदोरे, सुनील गुरव, संतोष उदगिरी, अमोल धाबळे, माणिक यादव, मारुती कटकधोंड, गीतेश चुळभरे, डॉ.चंद्रकांत चिलजवार आदी मान्यवर उपस्थित होते.




# पंढरीच्या सुपूत्राने पार केली इंग्लिश खाडी

सुराज्य/पंढरपूर

अत्यंत खडतर व शारिरीक, मानसिक कसोटी पाहणारी इंग्लिश चॅनल स्विम अर्थात इंग्लिश खाडी पोहून पार करण्याची मोठी कामगिरी पंढरपूरच्या पंधरा वर्षीय सुपूत्राने पार पाडली. यामुळे पंढरीचा डंका साता समुद्रापार वाजला आहे.

मुळचे पंढरपूरचे डॉ. शिवानंद जाधव हे सध्या लंडनमध्ये असून त्यांचा पंधरा वर्षीय मुलगा सहिष्णू व त्याच्या साथीदारांनी इंग्लिश खाडी पोहून पार करण्याचा भीम पराक्रम केला आहे. जाधव कुटुंबिय मुळचे पंढरपूरचे असून त्याचे आजोबा ह.भ.प. भाऊसाहेब धोंडोपंत जाधव-भोसेकर हे वारकरी संप्रदायातील आहेत. टाकळी येथे त्यांचे घर असून मोहोळ तालुक्यातील पेनुर येथे वारकरी संप्रदायाचा मठ देखील आहे.

इंग्लिश खाडी ही निसर्गत: अतिशय फसवी आहे. वीजा चमकत पडणारा पाऊस, जेली फिश, डॉल्फिन, सील सारखे मासे, प्रचंड थंड पाणी, यासोबतच अतिशय अनिश्चित लाटांच्या प्रवाहांसाठी आणि सतत बदलणाऱ्या हवामानासाठी ती ओळखली जाते. मोहिमेस प्रारंभ झाल्यानंतर अनेकदा वातावरणात प्रचंड बदल होऊन जलतरणपटूंपुढे मोठे आव्हान उभे राहते. अनेक दशकांपासून जगभरातील जलतरणपटूंच्या शारिरीक



क्षमते बरोबर मानसिक सहनशक्तीची परीक्षा या खाडीने घेतली आहे. यामुळेच इंग्लिश खाडी पोहून पार करणे जलतरणपटुंचे स्वप्न असते. सहिष्णू जाधव ने ही कामगिरी पंधराव्या वर्षीच पार पाडली. यामुळे तरूण जलतरणपटुमध्ये त्याचा समावेश झाला आहे. आजवर केवळ ६२ भारतीयांनी इंग्लिश चॅनल यशस्वीरित्या पोहून पार केली आहे.

सहिष्णूचा प्रवास आठ महिन्यांपूर्वी सुरू झाला जेव्हा त्याने हे अवघड आव्हान स्वीकारण्याचा निर्णय घेतला. त्याचे इंग्लिश प्रशिक्षक निक्की पोप आणि ट्रेसी क्लार्क यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने डोव्हर येथे कठोर प्रशिक्षण घेतले. त्यांच्या संघाने महाकाय इंग्लिश चॅनेलच्या थंडगार पाण्यातून ७ सप्टेंबर रोजी पहाटे ३ वाजता पोहण्यास सुरूवात केली. इंग्लंड ते फ्रांस हे सुमारे ४० किलोमीटरचे अंतर त्यांनी १४ तासांमध्ये पूर्ण केले. समुद्रातील भरती आहोटी मुळे कोणीही कधीही एकाच सरळ रेषेत पोहू शकत नाही तर इंग्रजी एस आकारामध्ये पोहावे लागते. त्यानेही कामगिरी पार पडल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांनी अगदी मराठमोळ्या पद्धतीने त्याचे औक्षण करून अभिनंदन केले.

सहिष्णूने ही कामगिरी पार पाडल्यामुळे त्याच्या पंढरपूर येथील आजोबांनी आनंद व्यक्त केला. तसेच भविष्यात देखील त्याने देशाचे नाव मोठे करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

# पांडुरंग साखर कारखान्याकडून सर्वाधिक एफ.आर.पी.

## पोळा सणासाठी प्रती मे.टन रु.१००/- प्रमाणे ऊस बील बँकेत वर्ग

सुराज्य/श्रीपूर

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये गाळप केलेल्या ऊसास प्रती मे. टन रू.१००/- प्रमाणे ऊस बिल बँकेत वर्ग केले असून शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ऊस बिलाची एकूण रक्कम रू.१० कोटी जमा केली आहे.

कारखान्याने नेहमीच शेतकऱ्यास पोळा, दिपावली सारख्या सणासाठी योग्यवेळी पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. पोळा सणासाठी हप्ता देणेची परंपरा यावर्षी देखील कायम ठेवीत ''शेतकरी हिताय, कामगार सुखाय'' या उक्ती प्रमाणे मोठया मालकांच्या आदर्शाचा वारसा कारखान्याचे व्हा.चेअरमन, संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, अधिकारी, कर्मचारी व उस उत्पादक शेतकरी यांच्या सहकार्याने यापुढेही असाच सुरु राहील असे कारखान्याचे चेअरमन मा.आ प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन कैलास खुळे


आ.प्रशांतराव परिचारक चेअरमन | कैलास खुळे व्हा.चेअरमन | डॉ.यशवंत कुलकर्णी कार्यकारी संचालक

व कार्याकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

कारखान्याचे चेअरमन मा.आ प्रशांतराव परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली गळीत हंगाम २०२२-२३ अत्यंत उत्कृष्ठपणे चालला असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनीही कारखान्याच्या व्यवस्थापनावर विश्वास ठेवून या हंगामात कारखान्यास ऊस देवून सहकार्य केले आहे. मा.आ. प्रशांतराव परिचारक यांच्या सुयोग्य नियोजनामुळे गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये कारखान्याने जिल्हयात प्रथम क्रमांकाचा साखर उतारा मिळविला असून जिल्हयात प्रथम क्रमांकाचा ऊस दरही देणार आहे. आजपर्यंत कारखान्याने प्रति मे.टन रू.२६००/- प्रमाणे ऊस बील अदा केलेले आहे. उर्वरित एफ.आर.पी. ची रक्कम दीपावली सणावेळी अदा करणार आहोत. चालू हंगामात आसवनी प्रकल्पामधून वाढीव क्षमतेनुसार इथेनॉल व उपपदार्थाची निर्मिती केली आहे. तसेच ज्यूस टू इथेनॉलचीही निर्मिती केली आहे त्याचबरोबर पुढील हंगामात कारखान्याचे विस्तारीकरण होणार असून ऊस गाळप प्रती दिन ९००० मे.टन प्रमाणे होणार आहे. गाळप हंगाम २०२२-२३ मध्ये कारखान्याने ९.६१ लाख मे. टन ऊस गाळप करून ११.५० टक्के सरासरी साखर उताऱ्याने ९.५५ लाख क्विं. साखरेचे उत्पादन घेवून कारखान्याने उद्दीष्टपुर्ती केली आहे. पुढील हंगामासाठी कारखान्याकडे ११ लाख मे.टनाच्या ऊस नोंदी आहेत.

> गळीत हंगाम २०२३-२४ हा वाढीव कार्यक्षमतेने चालविणेसाठी कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक, व्हा.चेअरमन कैलास खुळे, कारखान्याचे संचालक, अधिकारी व कामगार वर्गाच्या सहकार्याने कारखान्यामधील सर्व कामे अंतिम टप्प्यात असून ती लवकरच पुर्ण होऊन गाळप हंगाम वेळेवर सुरु केला जाणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी तोडणी व वाहतुक यंत्रणा सक्षमपणे उभारली आहे.
>
> **- डॉ. यशवंत कुलकर्णी**
>
> कार्यकारीसंचालक कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग कारखाना श्रीपुर

गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये गाळप केलेल्या ऊसास पोळा सणासाठी प्रती मे. टन रू.१००/- प्रमाणे ऊस बील दिलेमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे. शेतकऱ्यांना महत्वाचा असणारा पोळा सण हा मोठ्या आनंदात साजरा करणेसाठी पैशाची गरज असताना कारखान्याने ऊस बिलाची रक्कम बँकेत खात्यावर वर्ग केली असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन कैलास खुळे व संचालक दिनकरराव मोरे, वसंतराव देशमुख, उमेशराव परिचारक, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासो यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, हणमंत कदम सुदाम मोरे, विजय जाधव, किसन सरवदे, शामराव साळुंखे, राणू पाटील, तंज्ञ संचालक दाजी पाटील, दिलीप गुरव, कारखान्याने कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी आदी. उपस्थित होते.



## राष्ट्र उभारण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण : बिराजदार

**अक्कलकोट** : राष्ट्र उभारण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण असून होकारात्मक विचारानीच देश प्रगतीपथावर पोचतो.हा विचार रुजवून देश बलवान करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन शिवराज बिराजदार यांनी श्री क्षेत्र तीर्थ रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रमात मांडले.कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यान्च्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांकडून करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकाविषयी आदर भावना व्यक्त करणारे मनोगत व्यक्त केले. शिक्षकांनी पाच सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त महत्त्वपूर्ण माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी यानी केले .आभार प्रदर्शन सिध्दाराम पाटील यांनी मानले.




## आकाश वाघमारे यांचा सत्कार

**उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील कोंडी येथील तालुका उत्तर सोलापूर येथील आकाश कैलास वाघमारे यांची बॉर्डर ऑर्गनाईज ( बी आर ओ) पदी निवड झाल्याबद्दल कोंडी ग्रामस्थाच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी भव्य नागरी सत्कार करण्यात आला.यावेळी उपसरपंच किसन भोसले, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी निळ, प्रसाद निळ, मनोज निंबाळकर, लक्ष्मण साबळे, बाळासाहेब वाघमारे, वंचित बहुजन युवक तालुका अध्यक्ष- दाजी वाघमारे, रिपाई (आठवले )गट तालुका संघटक सचिव- दत्ता वाघमारे, तालुका युवक कार्याध्यक्ष- सागर वाघमारे, उत्तर विधानसभा अध्यक्ष- गौतम वाघमारे, दत्ता गडगडे, नितीन वाघमारे, दादा कांबळे, आप्पा वाघमारे, विनोद मुसंडे, नवनाथ वाघमारे यांच्यासह भीम क्रांती तरुण मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## डॉ. हाजीमलंग शेख यांना मानसशास्त्रात पीएच. डी.



**उ. सोलापूर** : पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठच्या वतीने डॉ. हाजीमलंग अकबर शेख यांना पी एच डी पदवी ३१ ऑगस्ट २३ रोजी प्रदान करण्यात आली. डॉ. शेख यांनी पश्चिम महाराष्ट्रातील मुस्लिम सामाजातील शैक्षणिक स्तर, धार्मिक आस्था आणि मानसिक स्वास्थ्य यांचा अभ्यास हा पी एच डी संशोधनाचा विषय निवडलेला होता. संशोधन कार्यात प्रा. डॉ.यु.व्ही. भोसले सर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रबंध सादरीकरणावेळी बाह्य समीक्षक प्रा. डॉ. शशिकांत खलाणे , धुळे, अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. वसंत कोरे, सोलापूर यांच्यासह इतर संशोधन अभ्यासक विद्यार्थी उपस्थित होते. या कार्याबद्दल डॉ. शेख यांचे कुटुंबीय व मित्रवर्ग यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले. डॉ. शेख हे सध्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील मानसशात्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

# पाणी वेळेत सोडावे अन्यथा अधिकाऱ्यांना घेराव : धवलसिंह

सुराज्य/मंगळवेढा




टेल टू हेड या शासन नियमाप्रमाणे मंगळवेढ्याच्या दुष्काळी भागाला म्हैसाळ योजनेचे पाणी वेळेत सोडावे अन्यथा अधिकाऱ्यांना घेराव घालू असा गंभीर इशारा म्हैसाळ पाणी योजनेच्या अधिकाऱ्याला भ्रमणध्वनीव्दारे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी दिला आहे.

मंगळवेढा येथे तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटी यांच्यावतीने जनसंवाद यात्रा काढण्यात आली. भाजप सरकारच्या कालावधीत महागाई प्रचंड वाढली आहे. यामध्ये पेट्रोल, डिझेल, गॅस, खाद्य डाळी या वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. बेरोजगारीने सर्वाधिक उच्चांक गाठला आहे. शेतकऱ्याचे उत्पन्न दुपटीने करणाऱ्या भाजप सरकारने खते, बियाणे, शेतीशी निगडीत साहित्य यांच्या किंमती चौपट वाढविल्या, मात्र शेतीमालाला हमीभाव अद्यापही मिळाला नाही.

शेती साहित्यावर १८ टक्के जीएसटी लावली आहे. या व अन्य मागण्या संदर्भात जनसंवाद यात्रा काढून काँग्रेसच्या वतीने प्रांत अधिकारी यांना दुष्काळी परिस्थितीवर विविध उपाययोजना करणेबाबत निवेदन देण्यात आले.

दरम्यान यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे आदींनी प्रांत कार्यालयासमोर गेली चार दिवस सुरु असलेल्या आंदोलनास भेट देवून आंदोलन कर्त्यांच्या भावना जाणुन घेतल्या असता त्यावेळी ते बोलत होते. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र युवा आघाडीचे अध्यक्ष ॲड. राहुल घुले, युवराज घुले, आबा खांडेकर, राजाभाऊ चेळेकर, मारुती वाकडे, पांडूरंग जावळे, ॲड. अर्जुन पाटील, रविकिरण कोळेकर, मनोज माळी, इसाक शेख, अशोक चेळेकर, सिध्देश्वर हेंबाडे, संतोष बिराजदार आदीसह काँग्रेसचे व स्वाभिमानीचे आंदोलक यावेळी उपस्थित होते.

मोहिते पाटील पुढे म्हणाले,सर्वसामान्य शेतकरी मजूर कामगार यांच्या प्रश्नाकडे या सरकारला लक्ष द्यायला वेळ नाही त्यामुळे हे सरकार बदलले पाहिजे, सर्व घटकांना बरोबर घेऊन या देशात परिवर्तन करणे गरजेचे आहे पुरोगामी सोलापूर जिल्हा पुन्हा प्रगतीपथावर घेण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे. पश्चिम महाराष्ट्र युवा आघाडीचे अध्यक्ष ॲड. राहुल घुले म्हणाले की, स्व. नागनाथअण्णा नायकवडी, स्व. गणपतराव देशमुख, स्व.भारत भालके,शिवाजीराव काळुंगे यांनी उभारलेल्या पाणी चळवळीच्या माध्यमातून म्हैसाळचे पाणी मतदार मतदारसंघाच्या दारापर्यंत आले. परंतु हेच आमच्या हक्काचे पाणी राज्यकर्त्यामुळे देण्यास टाळाटाळ केली जात आहे.

आमच्या घशात जाणारे पाणी कोण अडवत आहे असा प्रश्न उपस्थित करून अधिकारी व विमा कंपनी यांच्यात संगणमत असल्यामुळे शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई न देता ठराविक महसूलला भरपाई देऊन इतर मंडल वगळून अधिकारी त्यांच्या सोयीची भूमी घेत असून यास सरकारचे प्रतिनिधी व लोकप्रतिनिधी याला पाठीशी घालत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी बोलताना केला.



## भरतेस वळवडे यांच्याकडून संपूर्ण दिवसाचा महाप्रसाद

### गौडगाव श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात भाविकांची गर्दी

सुराज्य/अक्कलकोट

जयसिंगपूर,जिल्हा कोल्हापूर येथील भरतेस आदिनाथ वळवडे यांच्या वतीने गौडगाव येथील श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात एक दिवशीय महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच दुपारची महाकाकड आरतीचा मान नागणसुरचे बसवराज प्रचंडे व भरतेश वळवडे यांना मिळाला.

दक्षिणमुखी जागृत मारुतीच्या दर्शनासाठी आलेल्या शेकडो भाविकांनी पहाटे पाच वाजेची महा- पुजा,मारुती रुद्राभिषेक, होमहवन व महाआरतीमध्ये सहभागी झाले होते.ह्या पूजेच्या लाभ घेण्यासाठी भाविक भक्तांनी शनिवारी ४ वाजेपासुन गौडगांव येथील जागृत मारूतीच्या दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती.यावेळी श्री मारूतीच्या दर्शनासाठी आलेल्या भविकांच्या लांबच्या लांब रांगा लागलेली दिरुन आली.मंदिर समितीच्या वतीने दर्शनाची सुलभ सोयची व्यवस्था केली आली.

श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात संपूर्ण दिवसाचे महाप्रसाद देणाऱ्या मारुती भक्त जयसिंगपूर,जिल्हा कोल्हापूरचे भरतेस आदिनाथ वळवडे यांचा मारुतीचा फोटो व शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच दुपारच्या काकड आरतीचे मानकरी यांचा देखील मंदिर समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला.

मारुतीच्या दर्शनासाठी राज्य, परराज्यातुन आलेल्या हजारो भाविकांनी शनिवारी शांततेत श्री जागृत मारुतीचे दर्शन घेतले.यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, उपाध्यक्ष सिद्राम वाघमोडे, सचिव प्रकाश मेंथे,भारत ननवरे,चौडप्पा सोलापूरे,बिरप्पा पुजारी,परमेश्वर सुतार,ज्ञानेश्वर फुलारी,श्रीमंत म्हेत्रे, श्रीमंत सावळतोट,प्रकाश सनकळ,अमसिद्ध कोरे यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डॉ. सुनील विभुते यांना जागतिक कथा स्पर्धेचा पुरस्कार

सुराज्य/बार्शी

अमेरिकेतील डेट्राईट शहरामधून प्रसिद्ध होणाऱ्या निनाद' या जागतिक मराठी दिवाळी अंकाने आयोजित केलेल्या जागतिक कथा स्पर्धेत प्रा. डॉ. सुनील विभुते यांच्या ऑक्सिडीग्रेड' या विज्ञान कथेला उत्कृष्ट कथेचा पुरस्कार मिळाला आहे. या कथा स्पर्धेमध्ये भारत, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया अशा विविध देशातील शंभराहून अधिक मराठी लेखकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचा निकाल बुधवार दि. ०६ सप्टेंबर २०२३ रोजी फेसबुक



व इन्स्टाग्रामवरून जाहीर करण्यात आला. अमेरिकन डॉलरच्या स्वरूपात रक्कम व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या कथा स्पर्धेसाठी प्रसिद्ध ज्येष्ठ लेखक श्री. रामदास फुटाणे, निलीमा बोरवणकर व मोहना जोगळेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. निनाद या दिवाळी अंकाने जागतिक कथा स्पर्धा आयोजित करण्याचे हे पाचवे वर्ष आहे. डॉ. सुनील विभुते यांच्या या यशाबद्दल प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, डॉ. प्रकाश वडगावकर, प्रसिद्ध शिक्षणतज्ञ डॉ. छाया पाटील, प्रसिद्ध विज्ञान लेखक प्रा. डॉ. संजय ढोले, डॉ. सदानंद बोरसे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मसाप सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर, मसाप बार्शीचे अध्यक्ष श्री. निपाणीकर सर, डॉ. विक्रम निमकर, डॉ. यादव, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक आणि जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. विभुते यांना विज्ञान कथा लेखनाबद्दल या पूर्वी अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

# गणपती मंदिराजळील सर्व्हिस रस्त्याचे काम सुरु

सुराज्य/सोलापूर

मोहोळ पंढरपूर रस्त्यावरील चंद्रमौळी गणेश मंदिर ते श्रध्दा इंग्लिश मीडियम स्कूल पर्यंत सातत्याने होत असलेल्या सर्व्हिस रस्त्याच्या मागणीची दखल घेऊन अखेर मोहोळ पंढरपूर आळंदी पालखी महामार्ग प्रशासनाने शुक्रवारपासून काम सुरू केले असून यामुळे गणेश मंदिरात येणाऱ्या भाविकांबरोबरच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही दिलासा मिळाला असून त्यांची सोय होणार आहे.

मोहोळ पंढरपूर रस्त्यावर प्राचीन चंद्रमौळी गणेश मंदिर, नीलकंठेश्वर मंदिर तसेच शहरातील नामवंत अशी जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे.या चंद्रमौळी गणेश मंदिराच्या दर्शनासाठी सातत्याने भाविकांची गर्दी असते. तसेच शाळेत जवळपास २०० विद्यार्थी पहिली ते चौथीच्या वर्गात शिक्षण घेत आहेत.

मोहोळ पंढरपूर या पालखी मार्गाचे काम सुरु असताना पंढरपुर कडून मोहोळ कडे येणाच्या रस्त्यावरील अरुंद पूल व त्या लगत सर्व्हिस



रस्ता नसल्यामुळे मंदिराला येणाऱ्या भाविकांना व शाळेतील मुलांना अपघाताची मोठी भीती निर्माण झाली होती. चंद्रमौळी गणेश मंदिर जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती, जय महाराष्ट्र प्रतिष्ठान, चंद्रमौळी गणेश मंदिर अन्नछत्र मंडळ, मोहोळ तालुका पत्रकार संघ,चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करत या परिसरात सर्व्हिस रस्त्याची व वेगळ्या पुलाची अत्यंत गरज असल्याची मागणी मागणी करण्यात आली होती.

निवेदने व आंदोलनाचे इशारे दिल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने अखेर शुक्रवारपासून अंदाजे एक कोटी रुपयांचा १६० मीटर लांबीचा सर्व्हिस रस्ता व त्या रस्त्यावर साडेपाच मीटरचा वाढीव पूल असे काम सुरू केले. यामुळे शाळा व्यवस्थापन समिती व विविध सामाजिक संस्थांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

यावेळी सुरुवात शांतिलाल भिवरे, विक्रम देशमुख भारत नाईक, कंपनीचे अभियंता अक्षय आठवले, सुधीर पवार, बॉस गोडसे,पवन गोडसे, अतिष गरड, अविष्कार गोडसे आदींसह नागरिक उपस्थित होते.

> गणेश मंदिर शाळा व्यवस्थापन समिती, चंद्रमौळी गणेश मंदिर अन्नछत्र मंडळ,जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष विक्रम देशमुख यांनी सर्व्हिस रस्ता व त्यावरील पूल व्हावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. आषाढी एकादशी दिवशी आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता.तात्कालीन तहसीलदार राजशेखर लिंबारे,पोलीस निरीक्षक अशोक सायकर, तसेच पालखी मार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य केल्यामुळेच हा विषय मार्गी लागला.

# देश प्रेमाची परिभाषा रियल लाइफच्या जवानांकडून शिकली पाहिजे: वानखेडे

सुराज्य/नातेपुते

नातेपुते शहरात या भागातील खूप लोक आर्मीमध्ये आहेत. हे बघून अभिमान वाटला. मुलांना राष्ट्रवाद व खरे आदर्श कोण आहेत याची जाणीव करून द्या. समोर बसलेले रियल लाइफ चे जवान आहेत. सिनेमातील नाचणारे जवान नाहीत. देश प्रेम ही परिभाषा रियल लाइफ च्या जवानांकडून शिकली पाहिजे. लहानपणापासून आपल्या मुलांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शंभू महाराज, तानाजी मालुसरे हे कोण आहेत याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. देशभक्ती फक्त १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी होत नाही तर ती दररोज केली पाहिजे असल्याचे मत आय.आर.एस समीर वानखेडे यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते येथील राज आनंद मंगल कार्यालय येथे घेण्यात आलेल्या बीएसएफ मधील जवान अनिल माने यांच्या सेवानिवृत्ती समारंभाच्या कार्यक्रमा प्रसंगी बोलत होते. पुढे बोलत असताना वानखेडे म्हणाले की, देशभक्तीच्या मार्गावर संकटे खूप आहेत. याला पकडलं त्याला पकडलं याच्याकडून एवढे पैसे घेतले असे अनेक आरोप लावले जातात. आमच्यावर ही काय कमी आरोप लागले काय. दररोज आरोप लावले जातात. परंतु पैसे आम्हाला मोटिव्हेट



> देशासाठी रक्त वाहणाऱ्या माणसाची कथा माझ्या डोळ्यासमोर अनुभवायला मिळाली यापेक्षा मोठे भाग्य काय. अनिल माने यांच्या बायकोचे ही कौतुक कि ती एका सैनिकाची बायको आहे. ही खूप अभिमानाची बाब आहे.भारताच्या सेनेचे नेतृत्व करतात ते पोलादी आहेत टीका करणारे यांनी देशासाठी काय केले आहे.
>
> **- क्रांती रेडेकर ( सिनेयअभिनेत्री)**

करत नाहीत आम्हाला फक्त राष्ट्रवाद व देशभक्ती मोटिव्हेट करते २०२१ साली ३५७ ड्रग्स लोकांना पकडले दाऊद इब्राहिमच्या भावास अटक केली. मुंबई येथील डोंगरी भागात दाऊद ची गँग त्या ठिकाणी पोलीस सुद्धा जाण्यास घाबरतात त्या भागात शंभर लोकांसोबत आम्ही चार जण लढलो आहे.अनेकांना चित्रपटातील हिरो माहित आहेत परंतु खऱ्या अर्थाचे हिरो त्यांचे नाव माहित नाही ज्यांनी देशासाठी जीव दिला आहे अशा महापुरुषांची ओळख खऱ्या अर्थाने करून देणे गरजेचे असल्याचे मत आय आर एस समीर वानखेडे यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमासाठी आय. आर.एस. समीर वानखेडे, सिनेय अभिनेत्री क्रांती रेडेकर, धैर्यशील मोहिते पाटील, माजी आमदार ॲड. आर. जी. रुपनवर, समाजरत्न राजेंद्र भाऊ पाटील, नगराध्यक्षा,अनिता लांडगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, माळशिरस पंचायत समिती सदस्य माऊली पाटील, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, ॲड. डि.एन.काळे, धैर्यशील देशमुख, नगरसेवक ॲड. बी.वाय. राऊत, अतुल पाटील, दिपक काळे, तसेच ॲड.शिवाजीराव पिसाळ, मारुती माने दीपक माने चिमाजी माने, गोविंद माने आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

तसेच सेवानिवृत्ती बद्दल बीएसएफ मधील जवान अनिल माने व पत्नी पल्लवी माने यांचा समीर वानखेडे व सिनेय अभिनेत्री क्रांती रेडेकर यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. सन्मानाला उत्तर देताना जवान अनिल माने म्हणाले की, हा सन्मान माझा नसून माझे आई-वडील व ज्यांनी मला घडविले ते माझे शिक्षक यांचा हा सन्मान असून सत्काराचे खरे मान्यवर तेच असल्याचे माने यांनी सांगितले. यावेळी धैर्यशील मोहिते पाटील माजी आमदार ॲड. आर.जी. रूपनवर यांनी मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत सरुडकर यांनी केले असून आभार ॲड. बी.वाय. राऊत यांनी मानले तर सूत्रसंचालन औदुंबर बुधावले यांनी केले.कार्यक्रमासाठी आजी-माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी सदस्य तसेच नातेपुते येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॉपी पुरवणाऱ्या ४ कर्मचाऱ्यांना बेड्या

## तलाठी भरती घोटाळ्याप्रकरणी मोठी कारवाई

सुराज्य/संभाजीनगर

**तलाठी भरती परीक्षेत परीक्षार्थींना उत्तरे पुरवणारे रॅकेट छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको एमआयडीसी पोलिसांनी उघडकीस आणला आहे. परीक्षा घेणाऱ्या टीसीएस या कंपनीच्या दोन कंत्राटी कामगारांनी हाउसकीपिंगचे काम करणाऱ्या महिलेला पैशाची लालूच देऊन परीक्षा सुरू असताना परीक्षार्थींना कागदावर उत्तरे लिहून देत उमेदवारांना कॉपी पुरवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चार आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.**

### उत्तरे पुरवण्यासाठी मास्टर कार्डचा वापर...

तलाठी भरती परीक्षे मध्ये सर्वात पहिली अटक करण्यात आलेल्या राजू नागरे याच्या ताब्यातून पोलिसांनी एटीएमसारखा दिसणारे एक उपकरण हस्तगत केले आहे. त्याला मास्टर कार्ड असे म्हटले जाते. या मास्टरकार्डमध्ये सिमकार्ड टाकण्याची व्यवस्था आहे तसेच मास्टर कार्ड हे तिघांकडे असण्याची शक्यता देखील पोलिसांनी वर्तवली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चिकलठाणा येथे आय ऑन परीक्षा केंद्राबाहेरून परीक्षार्थी असलेल्या उमेदवारांना उत्तरे पुरवणाऱ्या राजू भीमराव नागरे याला पोलिसांनी अटक केली होती. नागरे याच्या मोबाईलमधून एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे, यामध्ये परीक्षा केंद्रावर टीसीएसतर्फे कंत्राटी पर्यवेक्षक म्हणून नेमलेल्या दोन कर्मचाऱ्यांसह एका महिलेचा समावेश या रॅकेटमध्ये असल्याचे समोर आले आहे. यामध्ये शाहरुख युनूस शेख (वय २७ रा. वैजापूर) पवन सुरेश शिरसाट (वय २६, राहणार सिडको) बाली रमेश हिवराळे (वय ३० रा. ब्रिज वाडी) या आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर विकी रोहिदास सोनवणे (वय ३० रा. चौका) याच्या नावावर सिम कार्ड असलेल्या आरोपीला अटक केली आहे.

या रॅकेटमध्ये सक्रिय असलेली महिला आरोपी बाली हिवराळे ही सेंटरवर स्वच्छतेचे काम करते. प्रत्येकाची कसून चौकशी होत असताना महिला असल्यामुळे महिलेची कसून चौकशी होत नव्हती यामुळे बाली हिराळेही मोबाईल सोबत नेत असे. परीक्षा केंद्रावरील दुसऱ्या मजल्यावर असलेल्या शौचालयामध्ये जाऊन ती मोबाईलमध्ये आलेली उत्तरे कागदावर लिहून ती कंत्राटी पर्यवेक्षकाकडे नेऊन देत असे. यातील पवन शिरसाठ टीसीएसचा कंत्राटी कर्मचारी असल्याने त्याच्या मामाची मुलगी हाउसकिपिंगसाठी कामावर होती. तो हाउसकिपिंग काम करणाऱ्या बालीकडे जाऊन उत्तर लिहिलेली चिठ्ठी परीक्षार्थींना आणून देत होता.



# जी २० शिखर परिषदेची सांगता

सुराज्य/नवी दिल्ली

गेल्या दोन दिवसांपासून देशाच्या राजधानीत नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे जी २० शिखर परिषद सुरू होती. जगभरातील अनेक नेते आणि विविध देशांचे प्रतिनिधी या परिषदेत सामील झाले होते. या परिषदेत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली, दिल्ली जाहीरनामाही प्रसिद्ध झाला. आर्थिक, व्यावसायिक, पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी आदी मुद्द्यांवरून विविध देशांनी विचार आदान-प्रदान केले. दोन दिवस चाललेल्या बैठकीचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज समारोप केला आहे. तसंच, नोव्हेंबर २०२३ पर्यंत जी २० चं अध्यक्षपद भारताकडे आहे. त्यानंतर, हे अध्यक्षपद दुसऱ्या देशाकडे देण्यात येणार आहे. त्याबाबतही मोदींनी मोठी घोषणा केली आहे.

जी २० च्या समारोपावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 'भारताकडे नोव्हेंबरपर्यंत जी २० चं अध्यक्षपद आहे. यासाठी अडीच महिने बाकी आहेत. या दोन दिवसांत आपण सर्वांनी अनेक सूचना आणि प्रस्ताव मांडले आहेत. प्राप्त झालेल्या सुचनांवर आमच्याकडून विचार करण्यात येईल, ही आमची जबाबदारी आहे. नोव्हेंबरच्या शेवटी जी २० चं एक व्हर्चुअल सेशन ठेवलं जाईल. या सेशनमध्ये दोन दिवसीय शिबिरात झालेल्या मुद्द्यांची समिक्षा केली जाईल. तुम्ही या व्हर्च्युअल सत्रांत सहभागी व्हाल अशी आशा करतो. यासह, मी जी २० शिखर परिषदेचा समारोप घोषित करतो.

## महत्त्वाचे वृत्त...

### ऋषी सुनक सपत्नीक घेतले अक्षरधामचे दर्शन

**नवी दिल्ली :** इंग्लंडचे पंतप्रधान ऋषी सुनक आणि त्यांची पत्नी अक्षता मूर्ती यांनी आज रविवारी सकाळी (दि. १० सप्टेंबर) दिल्लीतील अक्षरधाम मंदिराला भेट दिला. जी २० शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी भारत दौऱ्यावर असलेल्या ऋषी सुनक यांनी अक्षरधाम मंदिराला भेट देणार असल्याचे सांगितले होते. नुकताच त्यांनी हिंदू संस्कृतीबद्दल आदर व्यक्त करत, आपल्याला हिंदू असल्याचा अभिमान असल्याचेही स्पष्ट केले होते. ब्रिटनच्या पंतप्रधानांनी शनिवारी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींची प्रशंसा केली होती.

सुनक म्हणाले, 'पंतप्रधान मोदींबद्दल मला प्रचंड आदर आहे आणि जी २० परिषद यशस्वी करण्यासाठी आपण मोदींना पाठिंबा देण्यासाठी आलो आहोत. सुनक असेही म्हणाले की, 'मला हिंदू असल्याचा अभिमान आहे. याच संस्कृतीतून माझे पालनपोषण झाले. पुढील काही दिवस मी इथे भारतात आहे, त्यानिमित्ताने मी मंदिरांना भेट देऊ शकेन अशी आशा आहे.'

### राज्यातील विजेची मागणी २१ हजार मेगावॅटवर

**नागपूर :** राज्यात काही दिवसांपूर्वी विजेची मागणी तब्बल २६ हजार मेगावॅटवर गेली होती. त्यामुळे एफ गटातील फिडरवर भारनियमन करण्याची पाळी महावितरणवर आली. परंतु एक-दोन दिवसांपासून राज्यातील बऱ्याच भागात पाऊस सुरू झाल्याने ही मागणी घसरून २१ हजार २३८ मेगावॅटवर आली आहे. पावसाने दडी मारल्याने राज्यात गेल्या आठवड्यात विजेची मागणी थेट २६ हजार मेगावॅटवर गेली होती. त्यापैकी २३ हजार ते २४ हजार मेगावॅटची मागणी महावितरणची होती. पावसाळ्यातील हा गेल्या काही वर्षांतील उच्चांक होता. महावितरणकडे मागणीच्या तुलनेत ९०० ते १,२०० मेगावॅट विजेचा तुटवडा असल्याने त्यांना एफ गटातील फिडरवर भारनियमन करावे लागले.

परंतु, आता राज्यातील बऱ्याच भागात पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे एकीकडे तापमानात घट तर दुसरीकडे कृषी पंपासह पंखे व इतरही विद्युत यंत्राचा वापर कमी झाल्याने मागणी घसरून २१ हजार २३८ मेगावॅटवर आली आहे. महानिर्मितीकडून ९ सप्टेंबरला दुपारी २.३० वाजता ४ हजार ६६८ मेगावॅट वीज निर्मिती सुरू होती. त्यापैकी ४ हजार ९ मेगावॅट औष्णिक, ४१ मेगावॅट सौर, १२६ गॅसपासून वीज निर्मिती केली जात होती. विजेची मागणी कमी झालेले भरनियमनाचे संकट तूर्तास दूर झाले आहे.

# न्यायाधीशांनी थेट पार्किंगमध्येच येऊन दिव्यांगाला दिला न्याय

सुराज्य/छ. संभाजीनगर



अपघातात ४२ टक्के कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या व्यक्तिला न्यायालयाच्या सुनावणीसाठी न्यायालयाच्या इमारतीमध्ये येणे शक्य नसल्यामुळे न्यायाधीश स्वतः पार्किंगमध्ये आले. त्यांनी दहा लाख रुपये ऐवजी सात लाख रुपयांमध्ये तडजोड करून दिव्यांग व्यक्तिला न्याय दिला. न्यायाधीश ए. आर. उबाळे यांच्या या कृतीचा सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील जिल्हा न्यायालयाच्या इमारतीमध्ये राष्ट्रीय लोक अदालत भरवण्यात आली होती. यात मोटार अपघातात जखमी असलेले गोरखनाथ पांडुरंग घुगे यांना मोठ्या अपघातात नुकसान भरपाईच्या प्रकरणात तडजोड करण्यासाठी सुनावणी ठेवण्यात आली होती. अपघातात जखमी झालेले गोरख घुगे यांनी ॲड. के. एस. तांदुळजे यांच्यामार्फत दहा लाख रुपये नुकसान भरपाईचा दावा केला होता. या सुनावणीसाठी न्यायालयाच्या इमारतीमध्ये येणे अपघातात जखमी झालेल्या घुगे यांना शक्य नसल्यामुळे ते कारमध्ये थांबले होते.

ही बाब जिल्हा न्यायाधीश एस. आर. उबाळे यांना कळली. नंतर ते स्वतः न्यायालयाच्या बाहेर पार्किंगमध्ये तडजोड करण्यासाठी आले. यावेळी दोघांचे म्हणण्यानंतर सात लाख रुपयांमध्ये तडजोड करण्यात आली. यावेळी विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव वै. प्र. फडणवीस, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सतीश मुंदवाडकर, सचिव ॲड. सदानंद सोनवणे, अर्जदार यांचे वकील ॲड. के. एस. तांदुळजे, विमा कंपनीचे वकील ॲड. के. एस. बनकर, ॲड. अनिरुद्ध उस्मानपूरकर, तसेच इन्शुरन्स कंपनीचे विधी अधिकारी रसिका सरदार आणि ॲड. मधुकर आहेर यांची यावेळी उपस्थिती होती.

# शिवसेनेचे कोणते आमदार अपात्र होणार?

सुराज्य/मुंबई

आमदार अपात्रता प्रकरणात येत्या गुरुवारपासून (१४ सप्टेंबर) सुनावणी सुरू होणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. या सुनावणीसाठी शिवसेनेच्या दोन्ही गटांना नोटीस पाठवण्यास सुरुवात झाली असून शिंदे यांच्या पक्षाच्या ४० आमदारांना, तर उद्धव ठाकरे यांच्या गटाच्या १४ आमदारांना नोटीस बजावण्यात आल्याचे समजते.



आमदारांना सुनावणीत सर्व पुरावे सादर करावे लागणार आहेत. तसेच अपात्रतेच्या कारवाईपासून वाचण्यासाठी युक्तिवादही करावा लागेल. विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी याबाबत निर्णय घेण्यास सांगितले होते. त्यानंतर आता याप्रकरणी १४ सप्टेंबरपासून सुनावणी सुरू होणार आहे. आमदार अपात्रता प्रकरणात शिंदे गटाने अलिकडेच विधानसभा अध्यक्षांनी पाठवलेल्या नोटिशीवर तब्बल ६ हजार पानांचे लेखी उत्तर सादर केले होते.

एकनाथ शिंदे यांच्या गटातील १६ आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी होणार आहे. नार्वेकर यांनी शिवसेनेच्या दोन्ही गटांच्या आमदारांना आपले म्हणणे सादर करण्यासाठी मुदत दिली आहे. शिंदे गटाच्या आमदारांनी तब्बल सहा हजार पानी उत्तर पाठवले असून आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील कारवाईला आता वेग आला आहे. शिवसेनेच्या उत्तरातील ठळक मुद्दे काढण्यास विधिमंडळाकडून सुरुवात करण्यात आली आहे. शिवसेना आमदारांच्या उत्तरात कायदेशीर बाजू मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आम्हीच शिवसेना हे पटवून देण्याचा शिंदे गटाच्या आमदारांचा प्रयत्न आहे.

शिंदे गटाकडून या लेखी उत्तरात काही पुरावे सादर करण्यात आले आहेत. उर्वरित पुरावे प्रत्यक्ष सुनावणीवेळी सादर करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आमचाच पक्ष योग्य असून आम्ही उत्तर दिले आहे. त्यावर आम्हाला समक्ष युक्तिवाद करायलाही आवडेल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. राष्ट्रवादीचा एक गट म्हणजेच अजित पवार आमच्यासोबत आहेत. त्यांनी उघड भूमिका घेतली आहे.


# 'ड्रग्ज'वर राज्याचे स्वतंत्र नियंत्रण

सुराज्य/मुंबई

अंमली पदार्थांची विक्री, पुरवठा आणि वितरणात गुंतलेल्यांवर प्रभावी कारवाई करण्यासह अंमली पदार्थांच्या अधीन गेलेल्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य पोलीस दलात अंमली पदार्थविरोधी टास्क फोर्स (एएनटीएफ) स्थापन करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे.

पुणे आणि नागपूर या दोन विभागात राज्यातील ग्रामीण व शहर पोलिसांची घटकनिहाय विभागणी करून या फोर्सचे स्वतंत्र कामकाज होईल. त्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक (एसआयजी) दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वात परिक्षेत्र आणि घटकनिहाय कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यात अंमली पदार्थांची विक्री, वितरण आणि वापर करणाऱ्या गैरप्रवृत्तींत वाढ झाल्याने तरुणांच्या सामाजिक, आर्थिक आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम जाणवत आहे. या निरीक्षणासह केंद्रीय गृह मंत्रालयाच्या निर्देशावरून महाराष्ट्रात 'एएनटीएफ' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात अमली पदार्थविरोधी कारवायांमध्ये वाढ होण्यासह 'ड्रग्जचे रॅकेट' उद्ध्वस्त करण्यासाठी पोलीस दलास बळ मिळणार आहे.

अंमली पदार्थविरोधी टास्क फोर्स स्थापन





दै. सुराज्य कार्यालयास 'खळगं' या चित्रपटाच्या टीमने रविवारी भेट दिली. यावेळी सुराज्यचे वृत्त संपादक पुरुषोत्तम कुलकर्णी व पत्रकार रोहन नंदाने उपस्थित होते.

# सोलापूरचे दोन कलाकार खळगं चित्रपटात

सुराज्य/सोलापूर

डोईवर छत्र असणाऱ्यांच्या शौर्य कथा नेहमीच ऐकायला मिळतात, मात्र जन्मापासून डोईवरचं छत्र न लाभलेल्या अनाथ मुलांच्या अंतर मनाच्या व्यथा समाजात नेहमीच दुर्लक्षित राहतात. अनाथ मुलांच्या व्यथा प्रभावीपणे समाजापुढे मांडण्यासाठी 'खळगं' हा मराठी चित्रपट मराठी सिने रसिकांसमोर येतोय.

अनाथांच्या वाट्याला आलेले पोरकं जगणं, समाजाची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी, त्यांचा जगण्याचा संघर्ष, या संघर्षमय वाटेवरील छोट्या-छोट्या वाटसरूच्या मोठ्या व्यथांचा वेध घेण्यात आला असून 'खळगं' हा चित्रपट येत्या २२ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील १५० चित्रपटगृहात एकाच वेळी प्रदर्शित होत असून, सोलापूरचे कलाकार सुलतान शिकलगर व भैरव जाधव या दोघांनी उत्तम अभिनय केला असल्याची माहिती चित्रपटाचे सहनिर्माते गोवर्धन दोलताडे यांनी रविवारी दुपारी पत्रकार परिषदेत दिली.

# भाजप-जनसेवाकडून नायडूंच्या अटकेचा निषेध

**हैद्राबाद :** आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि तेलगू देसम पक्षाचे प्रमुख चंद्राबाबू नायडू यांना अटक केल्यानंतर भाजपा पहिला राजकीय पक्ष होता, ज्यांनी यावर प्रतिक्रिया नोंदविली. आंध्रप्रदेश भाजपाच्या प्रदेशाध्यक्षा दग्गुबाती पुरंदेश्वरी यांनी नायडू यांच्यावरील कारवाईचा निषेध केला.

कोणत्याही शासकीय प्रक्रियेचे आचरण न करता, पुरेसे स्पष्टीकरण न देता, एफआयआरमध्ये नाव नसतानाही आणि योग्य पद्धतीने नोटीस न देता ही अटक करण्यात आली आहे, अशा शब्दात पुरंदेश्वरी यांनी कारवाईचा विरोध केला. अभिनेते आणि आता जन सेना पक्षाची स्थापना करून राजकारणात उतरलेले के. पवन कल्याण यांनीही या अटकेचा निषेध नोंदविला. सत्ताधारी वायएसआर काँग्रेस पक्ष लोकशाही विरोधी राजवट चालवत असल्याचा आरोप त्यांनी केला. तर आंध्र प्रदेश काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष एस. मस्तान म्हणाले की, 'आम्ही या प्रकरणात पुढे काय होते, त्यावर लक्ष ठेवून आहोत, त्यानंतर आम्ही प्रतिक्रिया देऊ.'

# सांगलीतील चार शेतकऱ्यांना पंखा आणि दोरीही द्या

## लोकअदालतीतील न्यायमूर्तींचा संताप

सुराज्य/सांगली



सांगलीतील चार शेतकऱ्यांच्या १९९८ सालच्या भूसंपादनासंदर्भात पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या संमतीच्या अटींबाबत लोकअदालत घेणाऱ्या न्यायालयाने शनिवारी नाराजी व्यक्त केली. तसेच, प्रकल्पासाठी जमीन देऊनही रास्त नुकसानभरपाई नाकारल्या गेलेल्या या शेतकऱ्यांना पंखा आणि दोरीही द्या, अशी उद्विग्नता व्यक्त केली.

लोकअदालतीत प्रकरण निकाली काढण्यासाठी राज्य सरकारने केलेल्या अर्जावरील सुनावणीच्या वेळी चारही शेतकऱ्यांची सरकारी पातळीवर कशी पिळवणूक केली गेली जात आहे हे लक्षात आल्यावर न्यायमूर्ती कमल खाता यांनी उपरोक्त उद्विग्न उद्‌गार काढले. अनेक वर्षांपासून नियमित न्यायालयांत प्रलंबित असलेली भूसंपादनाची प्रकरणे निकाली काढण्यासाठी शनिवारी उच्च न्यायालयात लोकअदालत आयोजित करण्यात आली होती. त्यातील, काही प्रकरणांची न्यायमूर्ती खाता यांच्यासमोर सुनावणी झाली. लोकअदालतीतील पक्षकार परस्पर संमतीने किंवा तडजोडीने वाद निकाली काढतात.

सांगलीतील चार शेतकऱ्यांच्या भूसंपादनाशी संबंधित प्रकरणात, राज्य सरकारच्या पाटबंधारे विभागाला खोजनवाडी परिसरात पाण्याची टाकी बांधायची होती. त्यासाठी, विभागाने उमराणी तालुक्यातील या चार शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. सरकारने दिलेल्या तुटपुंज्या मोबदल्याविरोधात शेतकऱ्यांनी सांगलीतील वरिष्ठ विभागीय आयुक्तांकडे रास्त नुकसानभरपाईसाठी दावा केला आहे.

# 'त्या' हरामखोराला अखेर फाशीच घ्यावी लागली

सुराज्य/अहमदनगर



### पप्पू शिंदे याची येरवडा जेलमध्ये आत्महत्या

राज्याला हादरवून टाकणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी हत्याकांड प्रकरणातील मुख्य आरोपी पप्पू शिंदे याने येरवडा कारागृहात आपलं जीवन संपवलं. रविवारी पहाटे गळफास घेऊन त्याने आपल्या आयुष्याला पूर्णविराम दिला. सुमारे पाच वर्षांपासून तो येरवडा तुरुंगात शिक्षा भोगत होता. कोपर्डीतील शाळकरी मुलीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याप्रकरणी त्याच्यासह तीन आरोपींना नगर जिल्हा व सत्र न्यायाधीश सुवर्णा केवले यांनी २०१७ ला दोषी ठरविलं होतं. दरम्यान एवढ्या मोठ्या हत्याकांडातील मुख्य आरोपी गळफास घेऊन आत्महत्या करतो, तेव्हा जेल प्रशासन काय करत होतं? असा सवाल आता उपस्थित होतोय. आरोपी जितेंद्र शिंदे याने रविवारी पहाटेच्या सुमारास गळफास घेतल्यानंतर काही वेळातच ही माहिती तुरुंग प्रशासनाला कळाली. त्यानंतर काही वेळातच पोलिसांनी तिथे जाऊन पाहणी केली. तुरुंग अधिकारी अमिताभ गुप्ताही थोड्या वेळातच येरवडा कारागृहात पोहोचणार आहेत. दरम्यान, आरोपी जितेंद्र शिंदे याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात नेल्याची माहिती आहे.

न्यायालयीन प्रक्रियेमध्ये जरी कोपर्डीतील आरोपींना फाशी झाली नाही तरी देवाजवळ न्याय होतो, अशा भावना कोपर्डीतील मुख्य आरोपी जितेंद्र शिंदेच्या आत्महत्येनंतर कोपर्डीतील नागरिकांनी व्यक्त केल्या. कोपर्डीमध्ये १३ जुलै २०१६ रोजी १५ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला होता. गावातीलच तीन युवकांनी मिळून तिचा खून केला होता. त्यानंतर न्यायालयाने तिघांनाही याप्रकरणी दोषी ठरवत त्यांना फाशीची शिक्षा ठोठावली होती. परंतु आरोपींनी या शिक्षेला वरील न्यायालयात आव्हान दिल्याने त्यांच्या शिक्षेची अंमलबजावणी झालेली नव्हती. हे सर्व आरोपी पुण्याच्या येरवडा कारागृहात शिक्षा भोगत आहेत.

कोपर्डी निर्भया अत्याचार आणि खून प्रकरणातील आरोपींना दिलेल्या फाशीच्या शिक्षेची तातडीने अंमलबजावणी व्हावी, यासाठी कोपर्डी गावात अनेक वेळा आंदोलने झाली. आताही जालना जिल्ह्यात मनोज जरांगे यांचे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन सुरू असताना कोपर्डीतूनही त्यांना पाठिंबा देण्यासाठी आंदोलन सुरू करण्यात आले होते. त्यामध्येही या आरोपींनी तातडीने फाशी द्यावी, ही मागणी करण्यात आली होती. त्यादरम्यानच रविवारी सकाळी येरवडा कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या मुख्य आरोपी जितेंद्रने गळफास लावून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

जितेंद्रच्या आत्महत्येनंतर कोपर्डी गावातल्या नागरिकांमध्ये उशिरा का होईना पण न्याय मिळाल्याची भावना होती. न्यायव्यवस्था आणि सरकार कमी पडले. पण वरच्या देवाच्या दारात न्याय आहे, अन्याय नाही. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये जरी कोपर्डीतील आरोपींना फाशी झाली नाही तरी देवाजवळ न्याय होतो, हा नियम सर्वांनाच लागू आहे. त्याप्रमाणे आमच्या भगिनीचे लचके तोडणाऱ्याचा न्याय झाला. शेवटी हरामखोराला फाशीच घ्यावी लागली.

निसर्गाने न्याय दिला आणि मराठा आरक्षणाचं आंदोलन चालू असताना, कोपर्डी ग्रामस्थांच्या मागणीची निसर्गाने दखल घेतली आणि त्यामुळेच आज ही घटना घडली, अशी प्रातिनिधिक प्रतिक्रिया कोपर्डीमधील नागरिक तात्या सुद्रिक यांनी बोलताना दिली.

ज्या कोपर्डी गावातील घटनेपासून मराठा आंदोलनाची सुरुवात झाली, त्या कोपर्डी गावात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा लढ्याचे रणशिंग फुंकण्यात आले होते. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ कोपर्डीत मंगळवारपासून (५ सप्टेंबर) ग्रामस्थ उपोषणला बसले होते. याला जोडूनच कोपर्डी घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा आणि दुष्काळ निवारण उपययोजनांसारख्या मागण्यांचाही समावेश आंदोलनात करण्यात आला होता. अखेर सहा दिवसांच्या आंदोलनानंतर सरकारने आश्वासन दिल्याने ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

**कोपर्डीची घटना काय?**

१३ जुलै २०१६ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास नववीत शिकणारी मुलगी आपल्या आजोबांच्या घरून मसाला घेऊन सायकलवरून घराकडे निघाली होती. त्यावेळी आरोपी शिंदे याने तिला तुकाई लवण वस्ती येथे अडवून तिच्यावर अत्याचार केला आणि नंतर खून केला. तिचे दोन्ही हात मोडलेले आढळून आले होते. आत्महत्या केलेला आरोपी जितेंद्र शिंदे हा कोपर्डीतीलच रहिवाशी होता. तो गावातील वीट भट्टीवर कामाला होता. त्याचे आईवडीलही मजुरी करतात.




## काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# कर्तृत्वान बापाच्या डॅशिंग पोरी

## बाप से बेटी सवाई...!

कुठल्याची क्षेत्र असो, अशा क्षेत्रात बापाचे बोट धरून पोरगं जेव्हा बापाच्या पावलावर पाऊल टाकतं, कर्तृत्वान बापाच्या खांद्याला खांदा लावून काम करायला लागतं, तेव्हा बापाचा उर भरून येतो. आपण वाढवलेली खरीखुरी 'संपत्ती' कामाला आली, अशी भावना बापाच्या मनात दाटून आल्याशिवाय राहता नाही. फक्ती ती 'त्या' बापाला शब्दातून व्यक्त करता येत नाही इतकच. अशा बापाची मुले बापाचाच आदर्श घेऊन समाजकारणात, राजकारणात किंवा बाप ज्या क्षेत्रात असेल त्यातून पुढे येत असेल तर समाजातील जाणकार मंडळींच्या तोंडातून आपूसकच वाक्य निघते, 'बाप से बेटा सवाई'. आता अलिकडील काळात हे वाक्य राजकारणात चांगलेच रुढ होत चालले आहे. बाप तर राजकारणात माहीर असलेलाच. त्यात त्याच पोरगं त्याहून तोऱ्यात फिरुन माहीर झालेला. स्वकर्तृत्वापेक्षा बापाच्या जीवावर मोठी झालेली ही राजकारणी पोरं महाराष्ट्राच्या धर्ती कमी नाहीत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात असे माहीर झालेले पुढारी आणि त्यांची कर्तृत्वशून्य पोरं जिथे-तिथे ढिगानं तुम्हा-आम्हाला पहायला मिळतील. पण अशामध्येही महाराष्ट्रात अशा काही 'कन्या' आहेत त्या दमदारपणे वाटचाल करीत, बापाचं भांडवल न करता आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर पुढे येत आहेत. कुठलाही विषय अत्यंत अभ्यासपूर्णतेने आणि आक्रमकतेने मांडण्याची त्यांची पध्दत, जनतेशी असलेला जिव्हाळा, सततचा जनसंपर्क, हजरजबाबीपणा ही त्यांची बलस्थाने आहेत. म्हणूनच या कन्या म्हणजे, 'बाप से बेटी सवाई' अशी गौरवाची ताफ घेऊन वाटचाल करीत आहेत.




शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो. ९५१८७७३०४८

### पुन्हा विधानसभा की संसदेकडे...



सोलापूरचे सुपूत्र, काँग्रेसचे एक वजनदार नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या पावलावर पाऊल ठेवत, आपल्या केवळ आणि केवळ कामाच्या आणि जनसंपर्काच्या जोरावर आमदारकीची हट्ट्रिक केलेल्या प्रणितीताई शिंदे. बोलायला फटकळ पण मनात कुठलाही भाव नाही. त्यांच्या फटकळपणामुळे साहेबांपासूनही त्यांचेच विश्वासू दुरावलेले. पण साहेब तरी कन्येच्या हट्टापुढे करणार काय?, बरे असो. तसं प्रणितीताई जाई-जाई या सामाजिक संस्थेच्या कार्यातून आपल्या कार्याच्या जोरावर पुढे आलेल्या. त्यांनी भल्याभल्यांना धूळ चारीत तीन वेळा आमदारकी पटकावली. पण मंत्रीपदापासून त्या दुरावलेल्याच. तरीही करणार काय?, राजकारणात जशी भरती, तशी ओहटीही लागते. त्याचाचा फटका प्रणितीताईंना आजवर बसलेला. पण तरीही त्या डगमगल्या नाहीत. आता शहर मध्यच्या वावटळीतून त्या बाहेर पडण्याच्या तयारीत आहेत. तसं शहर मध्यच काय साऱ्या महाराष्ट्राच्या राजकारणाचा गचकरण झालंय. त्यामुळे दिल्लीची संसंद त्यांना खुणावत आहे. तशी त्यांची मानसिकता आणि तयारी साहेब आणि प्रणितीताई यांनाच ठाऊक. पाहूया पुढे काय मांडलंय ते.

### सुरुंग निकामी करण्याची ताकद



राज्याच्याच नव्हेतर राष्ट्राच्या राजकारणात एक महत्वाचे प्रबळ नेते म्हणून ज्यांची ख्याती आहे ते शरद पवार. त्यांच्या कार्याचा अभ्यास करीत लहानपणापासूनच राजकारण आणि समाजाकारणाचे धडे घेऊन सध्या बापाच्या खांद्याला खांदा लावून राजकारण करणाऱ्या खा. सुप्रियाताई सुळे. बारामतीतून सलग तीन वेळा खासदार म्हणून निवडून आलेल्या. दिल्लीतील संसद भवनात इंग्रजी आणि हिंदीतून कुठल्याही विषयावर अभ्यासपूर्णतेने प्रहार करणाऱ्या नेत्या म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. जे काही बोलायचे ते बोला पण 'बाप' काढालात तर याद राखा, असे ठणकावून सांगत बापाची पाठराखण करणारी एक सबळ आणि भावनिक कन्या म्हणून आज त्यांच्याकडे पाहिले जाते. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अलिकडील काळात घडलेल्या वावटळीत त्या डगमगल्या नाहीत, हिरमुसल्या नाहीत, नाराज झाल्या नाहीत उलट बापाचे बोट धरुन त्या अनेकांवर तितक्याच ताकदीने हल्ला चढविताना आपल्याला दिसतात. त्यांना कितीही डिवचले तरी त्या तितक्याच शांततेने उत्तर देतात, हे त्यांचे खास वैशिष्टयं. आता भावी काळात त्यांच्या राजकारणाला सुरुंग लावण्याचा प्रयत्न होणार, पण त्या सामोरे जाऊन लावलेला सुरुंग निकामा कशा करणार, हे पाहणे तितके महत्वाचे ठरणार आहे.

### रश्मीताईंची वाट खडतर पण...!



करमाळ्याचे माजी आमदार स्व. दिंगबर बागल. ग्रामपंचायत, पंचायती समिती, दूधसंघ या तालमीतून पुढे आले. आणि कुणाला थांगपत्ताही लागू न देता करमाळ्याचे अपक्ष आमदार झाले. नंतर युती काळात थोडा काळात राज्यमंत्रीही झाले. याचा पुरेपूर फायदा घेत करमाळा तालुक्यात सहकारी संस्थांचे त्यांनी जाळे विणले. एक साखर कारखाना उभा केला. पण नियतीने त्यांच्या झडप घातली. त्यानंतर त्यांच्या पत्नी शामलताई बागल आमदार झाले. पुढे त्यांच्या कन्या रश्मीताई बागल समाजकारणाच्या जोरावर पुढे आल्या. निवडणुकीला उभे राहिल्या. पण पराभव झाला. तरीही त्या डगमगल्या नाहीत. आपले समाजकारण आणि राजकारण त्यांनी सुरुच ठेवले. त्यांच्या जवळच्या लोकांनीच दगा दिला. पण करणार काय?. आता त्या कुठल्या पक्षात नाहीत. पण भावी काळातील त्यांचे राजकारण खडतर असले तरी त्यावर त्या वाटचाल करणारच, कारण बापाचा आशीर्वाद त्या उराशी बाळगून आहेत. पाहूया त्या 'बाप से बटी सवाई' होतात काय?.

### बापाची संघर्षयात्रा तर कन्येची शिवशक्ती परिक्रमा



महाराष्ट्रातील एक मास लिटर स्व. गोपीनाथ मुंडे यांचे वक्तृत्व, आक्रमकणा, विषय मांडून त्यावर मोफ डागणे या गोष्टी जनता विसरु शकत नाही. सर्वसामान्य जनतेतून पुढे आलेला वलयांकित चेहरा म्हणून आजही त्यांचे नाव जनमानसात आहे. ते आज असते तर महाराष्ट्राच्या राजकारणाचे गचकरण झाले नसते, हे आजही त्यांच्या सहवासातील जुने जाणते सांगतात. आता त्यांच्या कन्या बापाचे रक्त घेऊन राजकारणात आणि समाजकारणात चांगल्याच सरसावल्या आहेत. राज्यात भाजपात कुठेही कसलीही ठिणगी पडली तरी माध्यमकरांचे लक्ष जाते ते बीडच्या पंकजाताई मुंडे यांच्याकडे. तसा आक्रमकपणा, बोलण्यातला बाणेदारपणा, समोरच्या शब्दाचे घायाळ करण्याची कला ही त्यांची मुख्य वैशिष्टं आहेत. भाजपात त्या थोड्या दुर्लक्षित झाल्या आहेत. हा त्यांचा पक्षातंर्गत मामला. पण यावर मात करण्यासाठी आपल्या बापासारखाचा चेहरा पुढे आणण्यासाठी बापाच्या संघर्ष यात्रेच्या धर्तीवरच त्यांनी 'राज्यात शिवशक्ती' परिक्रमेला सुरुवात केली आहे. या परिक्रमेद्वारे संपूर्ण राज्य ढवळून काढीत जनमानसात आपली वेगळी प्रतिमा निर्माण करण्याचे त्यांच स्वप्न आहे. एवढेच नाहीतर येणाऱ्या काळात आपल्या बळावर राज्यात २५ आमदार निवडून देण्याचा आत्मविश्वास त्यांनी प्रकट केला आहे. पाहू आगामी काळात त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा.

# 'बार्शी'च्या 'सरशी'ला तुम्ही कुठे नेतायं?

'जिथे कमी तिथे बार्शीची सरशी' हे वाक्य अख्ख्या महाराष्ट्रात बार्शीचे चर्चिले जाते. बार्शीतील सुजाण राजकारणी, शैक्षणिक दृष्ट्या अग्रेसर, आरोग्यदृष्ट्या अग्रस्थानी, दूरदर्शन आणि सिनेकलावंत घडवून महाराष्ट्राला दिलेले गुणीजन, साहित्यक्षेत्रात भरावी क्रांती एवढेच नाहीतर सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारिता या क्षेत्रात बार्शीकराची अनमोल रत्ने दिलेली. पण अलिकडील काळात बार्शीला कुणाचे ग्रहण लागले, हे काही कळेनासे झाले आहे. जो-तो उठतो आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडतो. त्या कुणावर?, का? आणि कशासाठी याचा काही शोध लागत नाही. किरकोळ कारणांचा आधार घेऊन आपल्या स्वार्थासाठी एकमेकांचे पाय ओढणाऱ्या जाणकऱ्यांना कळणार तरी कधी?, असा प्रश्न आम बार्शीकरांचा आहे. त्यामुळे बार्शीला तुम्ही कुठे नेताय?, असा प्रश्न पुढे येत आहे.

**सचिन अपसिंगकर**

बार्शीचे राजकारण पातळीहिन झाले आहे. राजकीय सुडबुध्दीमधून होणारे आरोप प्रत्यारोप तर रोजचेच आहेत. ऐकमेकांची उणी-दुणी काढणे हे तर आता नित्याचेच झाले आहे. बार्शी तालुक्याच्या राजकारणात वैयक्तिक आरोप हे नेहमीच केले जातात. पत्रकार परिषदांमध्ये बोलताना जीभ घसरणे बार्शीकरांना सवयीचे झाले आहे. एकमेकांच्या भानगडी आणि भ्रष्टाचार शोधून काढताना कायम राजकीय नेते कोर्टाच्या पायऱ्या चढताना दिसतात. उच्च न्यायालयातल्या याचिकांचे पेव फुटलेले आहे. माहितीचा अधिकार कार्यकर्त्यांचा बार्शीमध्ये मोठा वावर आहे. त्यामध्येही आता राजकारण शिरले आहे. बार्शीच्या राजकारणात गेली २५ वर्षे मोठा संघर्ष आहे. राजकीय रागापोटी जिवघेणे हल्ले झाले आहेत. राजकीय गटांमध्ये दंगली झाल्या आहेत. खोट्या तक्रारी दाखल होतात. पोलीस स्टेशन कायम राजकीय दबावाखाली असते. सर्वच प्रशासनामध्ये काम करणारे अधिकारी सतत धास्तवलेले असतात. त्यांना कायम राजकीय गटबाजीमधून होणाऱ्या शिफारशी आणि तक्रारी यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे बार्शीमध्ये बदली झाली तरीही अधिकाऱ्यासाठी मोठी डोके दुखीच असते. नियमात बसत नसेल तरी बसवा. हा शब्द त्यांना कायम ऐकावा लागतो. ऑर्डर ऐकली नाही तर टार्गेट होण्याची भिती असते.

राजकीय कार्यकर्ते फक्त शिवीगाळ करून थांबत नाहीत तर अंगावर धाऊन येतात. हे आता अधिकाऱ्यांच्या अंगवळणी पडले आहे. बार्शी तालुक्यात राजकीय हेतुने होणारी भांडणे, मारामारी, खुनी हल्ले, राजकीय दंगली यातून बार्शीकर सावरत नाहीत तो पर्यंत बार्शी तालुक्याच्या राजकारणात नवनवे ट्रेंड येत आहेत. बोगस फेसबुक अकाउंट काढून राजकीय आणि खाजगी जीवनातील लफडी विशीवर टांगण्याची नवी युक्ती वापरली जात आहे. त्यामध्ये आता राजकीय नेत्यांच्या खाजगी जीवनातील कथित महिलांबरोबरची संभाषणे जगजाहीर केली जात आहेत. या ऑडिओ क्लिप्सची मजा सर्वसामान्य घेत आहेत. त्यामुळे बार्शीचे राजकारण अतिशय गढूळ झाले आहे.

बार्शीच्या राजकारणातील नेत्यांच्या पत्रकार परिषदेतील भाषा ऐकूण अगोदरच सामान्य माणसांच्या मनात तिडीक निर्माण झाली आहे. त्यातच आता ऑडिओ क्लिप्समुळे अनेकांचे पितळ उघडे पडत आहे.

या ऑडिओ क्लिप्स किती खऱ्या आणि खोट्या व त्या कोणत्या मार्गाने उपलब्ध होतात हा पोलीस खात्याच्या चौकशीचा भाग आहे. मात्र या क्लिप्समुळे होणाऱ्या महिलांच्या बदनामीला कोण जबाबदार ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. बार्शीच्या राजकारणात हा ट्रेंड घातक आहे. राज्य महिला आयोगाने या क्लिप्सची दखल घेतली पाहिजे. अगोदरच राजकारणामध्ये महिलांचे होणारे शोषण जगजाहीर आहे. राज्याच्या राजकारणातही अनेकवेळा मोठ्या पदांवर काम करणाऱ्या महिला अधिकारी लोकप्रतिनिधी यांच्यावर आरोप करताना पातळी सोडली जात आहे.

खाजगी वाहिन्यावरील चर्चासत्रांमध्ये वाद प्रतिवाद करताना महिलांबाबत असभ्य भाषा वापरली जात आहे. आणि आता तेच लोन बार्शीसारख्या संस्कृती असणाऱ्या शहरांपर्यंत पोहोचली आहे. बार्शीच्या राजकारणात आजपर्यंत कधीही निर्माण झाली नाही. एवढी दुर्गंधी तयार झाली आहे. त्यामुळे बार्शीच्या राजकारणात विवेक शाबूत असणाऱ्या राजकीय नेत्यांनी या प्रवाहाला आवर घातला पाहिजे. कायदेशीर मार्गाने असे गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, इतकेच.

# माढ्यात भाजपा करणार विरोधकांवर मात

**अजित उंब्रजकर**



शिंदे-फडणवीस सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी झाल्यामुळे संपूर्ण राज्यासह लोकसभा मतदारसंघाचे राजकारणही आता फिरणार आहे. राष्ट्रवादीचा बालेकिल्लाला असलेला माढा गत वेळी रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या रूपाने भाजपाने मिळवला. आता सलग दुसऱ्यांदा लोकसभा मतदारसंघ जिंकण्याची संधी भाजपाला मिळाली आहे. आपल्या कार्यकाळात खासदार निंबाळकर यांनी केलेली विकास कामे आणि मतदारसंघात भाजपा आणि राष्ट्रवादी दोघांची असलेली ताकद यामुळे यंदाही माढा जिंकणे भाजपासाठी फारसे अवघड नाही, असे बोलले जात आहे.

सन २००९ आणि २०१४ मध्ये माढा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीने विजय मिळवला होता. एकेकाळी माढा लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीचा गड मानला जात होता मात्र २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या चाणक्य नितीने हा मतदारसंघ भाजपाच्या ताब्यात आला. त्यांनी सातारा जिल्ह्यातील खासदार रणजिसिंह निंबाळकर यांना या मतदारसंघातून उमेदवारी दिली. निंबाळकर यांनी फडणवीस यांचा विश्वास सार्थ करत राष्ट्रवादीचे उमेदवार संजयमामा शिंदे यांचा लाखांपेक्षा जास्त मताने पराभव करून विजय मिळवला. त्यानंतर खासदार निंबाळकर यांनी चार साडेचार वर्षाच्या काळात कोट्यवधी रुपयांचे विकास कामे केली. मोठमोठ्या प्रकल्पास निधी मिळवला. खासदार निंबाळकर यांनी मतदारसंघात अनेक कामे केली, मंजूर करून आणली. त्याच बरोबर त्यांनी संपूर्ण मतदारसंघातील लहान मोठ्या नेत्यांबरोबरही चांगले संबंध ठेवले आहे. विरोधकांनाही आपला करणारा नेता म्हणून खासदार निंबाळकर यांची ओळख आहे. आमदार बबनदादा शिंदे, आमदार संजय मामा शिंदे हे विरोधी पक्षातले असले तरी खासदार निंबाळकर आणि त्यांचे चांगले संबंध आहेत. या दोघांनी निंबाळकर यांना एकलाखांचे मताधिक्य देऊ असे जाहीर केले आहे.

# ...हा आक्रमणपणा रामभाऊ कायम ठेवा?

**संजय पाटील**

**पाणी हे जगण्याचे साधन, पाण्याविना सारे काही व्यर्थ, पाणी अडवा... पाणी जिरवा..., पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरा, पाणी हेच जलजीवन, जलपुनर्रभरण असे पाण्याविषयी बरेच शब्द तुमच्या-आमच्या कानी नेहमी पडत असतात. याच पाण्याचे महत्व लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील प्रत्येक जिल्ह्यात 'जलजीवन' ही महत्वाकांक्षी योजना आती घेतली. प्रत्येक कुटुंबाच्या घरापर्यंत पाणी गेली पाहिजे, हे ध्येय समोर ठेवून प्रशासन पातळीवर ही योजना कार्यक्षमपणे राबवावी, असे संदेश सर्वच जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना केंद्रस्तरावरुनच दिले गेले आहेत. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातही जलजीवन मिशन राबविण्यात येत आहे. पण कामात प्रशासकीय जितक्या गांभिर्याने पाहणे आवश्यक आहे, तितक्या गांभिर्यांने पाहिले जात नाही, ही वस्तुस्थिती आहे.**



जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जलजीवन मिशन कामाचा मुद्दा समोर आला. माळशिरसचे आमदार राम सातपुते यांनी जलजीवनचा विषय ऐरणीवर घेऊन पोटतिडकीने मांडला. या कामात अधिकारी कशा पध्दतीने कामचुकारपणा करतात, यावर त्यांनी बोट ठेवले. नंतर इतर आमदार त्यांच्या साथीला येऊन 'ओ' आला 'ओ' देत उभे राहिले, हा भाग वेगळा. पण खरंच याकामी अधिकाऱ्यांचा या कामात मनमानीपणा, अकार्यक्षमता, दुर्लक्षितपणा आहे का?, याचा शोध कोण घेणार?. नाहीतर याच शोध घेणारेच यात सामील असतील तर खऱ्याखुऱ्या शोधाचे काय? हा प्रश्न कायमचा अनुत्तरीत राहणार आहे. विशेष म्हणजे दस्तुरखुद्द पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीच जलजीवन कामाबाबत असंतुष्टता व्यक्त करीत खंत व्यक्त केली. तसं पालकमंत्र्यांनी खंत व्यक्त केली असली तरी अधिकारी वर्ग कितपत मनावर घेणार?, हाही प्रश्न आहे. त्यामुळे जिल्ह्यातील स्थानिक आमदारांनी जलजीवन कामावर जातीने लक्ष ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. आ. राम सातपुते यांच्यामुळे जलजीवनचा बट्ट्याबोळ नियोजन समितीत चव्हाट्यावर आला. पण याही पुढे आ. राम सातपुते आणि जिल्ह्यातील इतर आमदार या कामावर कशा पध्दतीने लक्ष ठेवणार?, हे पाहणे तितकेच महत्वाचे ठरणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावात जलजीवन म्हणजेच केंद्रीय पाणीपुरवठा योजनांची कामे सुरु आहेत. यामध्ये संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी या कामाचा सर्व्हेच चुकीचा केला आहे. ही योजना ज्या गावात सुरु आहे. याची त्या गावकऱ्यांना सुद्धा कल्पना नाही. जिथे पाणीच नाही त्याठिकाणी ही योजना राबविण्यात येत आहे. काम मिळविण्यासाठी फार मोठा आर्थिक व्यवहार झाला असल्याचा आरोप आ. सातपुते यांनी केला आहे. माळशिरस तालुक्यातील अनेक गावात सुद्धा जलजीवनचे काम अतिशय बोगस सुरु असल्याचा आरोप आ. रामभाऊ सातपुते यांनी करीत जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत चालणाऱ्या कारभारावर जबरदस्त प्रहार करीत संबंधित कामात ठेकेदार आपले घर भरण्याचा धंदा करीत आहेत. आ. रामभाऊ सातपुते यांची आक्रमकता लक्षात घेता सदरच्या जलजीवनच्या कामात फार मोठे गौडबंगाल आहे. यात तिळमात्र शंकाच नाही.



# भंडारा उधळला, एक चूक.... त्यावर झाल्या अनेका चुका!

**दीपक शेळके**

सहा महिन्यानंतर सोलापूर आलेल्या पालकमंत्र्यांवर भंडारा उधळण्याचा प्रकार अशोभनिय असला तरी या घटना अनेक चुकांचा परिपाक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. निवेदनाचे गोंडस नाव देऊन चर्चा करताना पवित्र असा भंडारा अंगावर टाकणे हे शेखर बंगाळे याचे चुकलेच. पण आरक्षणाचा विषय पेटलेला असताना एक समाजबांधव आंदोलनाचा पवित्रा घेत भलेही त्यांचा मार्ग चुकला असला तरी मागणी रास्त असल्याने त्या समाजबांधवाला पालकमंत्री आणि पोलिसांसमोर बेदम माराहण करणे हे देखील मोठी चूकच. शिस्तप्रिय पक्ष असेलेल्या भाजप पक्षाच्या शहराध्यक्षांनी थोड संयम ठेवत याठिकाणी वागणं क्रमप्राप्त होतं. त्यांनी तो संयम सोडला आणि एक समाजबांधवाला केलेली मारहाण ही देखील नरेंद्र काळे यांची सर्वात मोठी चूकच म्हणावी लागेल.

आंदोलनासाठी भंडाऱ्यांचा वापर करणे हे योग्य नाही धनगर समाजामध्ये भंडारा पवित्र मानला जातो. जत्रेच्या कालावधेत ट्रक भरून भंडाऱ्यांची उधळण केली जाते. भंडाऱ्यांची उधळण करणे म्हणजे मल्हारी मार्तंडाचा, बिरोबाचा, म्हाकूबाईचा आशीर्वाद मानला जातो. धनगर बांधवामध्ये आस्थेचे व श्रद्धेचे प्रतिक मानले जाते. त्याचा वापर आंदोलनासाठी करणे ही बंगाळेची कृती चुकीची आहे.

**समाजाची माफी मागितल्याने विषय संपत नाही :** आरक्षाच्या विषय घेऊन निवेदन देण्यासाठी आलेल्या समाजबांधवाला जनावरासारखे मारहाण करणे ही मोठी घोडचूक आहे. त्यानंतर समाजाची जाहीर दिलगीरी व्यक्त करत माफी मागितल्याने विषय संपत नाही. वास्तविक पाहता आरक्षणाचा विषय पेटलेला असताना एक समाजबांधव आंदोलनाचा पवित्रा घेत भलेही त्यांचा मार्ग चुकला असला तरी मागणी रास्त असल्याने त्या समाजबांधवाला पालकमंत्री आणि पोलिसा समोर बेदाम मारहाण करणे ही देखील मोठी चूकच. शिस्तप्रिय पक्ष असेलेल्या भाजप पक्षाच्या शहराध्यक्षांनी थोड संयम ठेवत वागण क्रमप्रात होते. त्यांनी तो संयम सोडला आणि एक समाजबांधवाला केलेली मारहाण. काळे यांच्या या कृत्यामुळे पक्षाची मोठी बदनामी झाली असली तरी काळे यांना समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागले.

**पोलीस यंत्रणा देखील चुकलीच :** पोलीस प्रशासनाची आयबीची गुफ्तचर यंत्रणा असते. मंत्री असो अथवा व्हीआयपी दौरा असो आयबीची यंत्रणा खास गुप्त माहिती काढून पोलीस प्रशासनास कळवते. अनुचित प्रकार टाळण्यासाठी संबंधित व्यक्तीला किंवा संघटनेवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. मराठा आरक्षणामुळे वातावरण पेटले आहे. मराठा ओबीसी समाज आमने सामने आला आहे. अशावेळी धनगर समाजाच्या आरक्षणासाठी एक तरुण पालकमंत्र्यांना भेटण्यासाठी येतो. त्याची खातरजमा चौकशी न करता पोलिसांनी त्याला आत सोडणे ही देखील पोलिसांची घोड चूकच . बंगाळे यांनी यापूर्वीही अशी कृत्ये केली आहेत. अनेकवार भंडारा उधळला आहे, ही पार्श्वभुमि पाहता कसून चौकशी अथवा त्याला मज्ञाव करणे हे पोलिसांचे कर्तव्य असताना जबाबदारी असतानाही पोलिसांनी पोलिसांनी आपली जबाबदारी नीट पाळली नाही ही चूकच केली.

**पोलिसाच्या चुकीचे खापर प्रसारमाध्यमावर :** भंडारा उधळण प्रकरणात प्रथम दर्शनी पोलीस प्रशासनाची चुक झाली. पोलीस यंत्रणेच्या गाफिलपणामुळे ही घटना घडली मात्र या चुकीचे खापर प्रसारमाध्यमाच्या डोक्यावर फोडून पोलिसांनी माध्यम प्रतिनिधीची उलट चौकशी केली. विविध प्रश्नांची सरबत्तीप्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीची करून आपल्या चुकीचं खापर प्रसारमाध्यमाच्या डोक्यावर फोडण्याचा प्रकार पोलिसांनी केला तो चुकीचाच.

**उरली सुरली लाज पालकमंत्र्यांनी राखली :** भंडारा उधळल्यानंतर मारहाण झालेल्या बंगाळेला पोलिसांनी ताब्यात घेतले मात्र पालकमंत्र्यांनी धनगर समाजाच्या या कार्यकर्त्याच्या कृतीत मला काहीही वावगे नसल्याचे सांगत गुन्हा दाखल न करण्याच्या फर्मान सोडलं. शहराध्यक्षांनी केलेल्या मारहाणी मुळे भाजपाची प्रतिमा मलिन झाली होती. त्यात गुन्हा दाखल झाला असता तर धनगर समाजाचा रोष आढावून घेत पुन्हा पक्षाची नाचक्की झाली असती त्यामुळे पालकमंत्र्यांनी गुन्हा दाखल न करण्याचे आदेश देत माझ्या अंगावर उधळलेला भंडारा श्रीखंडोबाचा आशीर्वाद असल्याचे सांगत उरली सुरली लाज पालकमंत्र्यांनी राखली